सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १३ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ९० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## युद्ध पुन्हा पेटलं! इराणचे कतार, संयुक्त अरब अमिराती आणि बहरीनवर मोठे हल्ले

वृत्तसंस्था

दोहा: इराणने कतार, संयुक्त अरब अमिराती (युएई) आणि बहरीनवर हल्ले सुरू केले आहेत. इराणकडून लागोपाठ दोनवेळा क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागण्यात आल्यामुळे कतारची राजधानी दोहा शहरात प्रचंड स्फोट झाले असून संपूर्ण परिसर हादरला आहे. दरम्यान, युएई आणि बहरीनच्या हवाई संरक्षण यंत्रणांनी इराणचे हल्ले परतावून लावण्यास सुरुवात केली आहे. होर्मुझच्या समुद्रधुनीतील इराणच्या आक्रमक कारवायांना प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने इराणवर हवाई हल्ले केल्यानंतर काही तासांतच इराणने हा मोठा प्रतिहल्ला केला आहे.राजधानी दोहा क्षेपणास्त्रांच्या स्फोटांनी हादरलीरविवारी पहाटेच्या सुमारास झालेल्या या हल्ल्यांमुळे दोहा शहर प्रचंड आवाजांनी हादरून गेले. इराणने डागलेली बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे कतारच्या हवाई संरक्षण यंत्रणेने हवेतच नष्ट केली, ज्यामुळे हवेतच मोठे स्फोट झाले. कतारच्या संरक्षण मंत्रालयाने अधिकृत निवेदन जारी करून याबाबत माहिती दिली आहे. कतारचे सशस्त्र दल देशाच्या दिशेने



येणारी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे निकामी करत असून परिस्थितीवर पूर्ण लक्ष ठेवून आहे, असे संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे.स्थानिक वेळेनुसार पहाटे ५:३६ वाजता दोहामधील नागरिकांच्या मोबाईल फोनवर हवाई हल्ल्यांचे इशारे देणारे सायरन वाजले. कतारच्या अंतर्गत व्यवहार मंत्रालयाने देशातील सुरक्षा धोक्याची पातळी उच्च असल्याचे जाहीर केले असून, सर्व नागरिकांना आपापल्या घरात किंवा सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्याचे आवाहन केले आहे. भीषण स्फोटांमुळे संपूर्ण दोहा शहरात भीतीचे वातावरण आहे.युएई आणि बहरीनमध्येही युद्धजन्य परिस्थिती कतारसोबतच इराणने संयुक्त अरब अमिराती (युएई) आणि बहरीनलाही लक्ष्य केले आहे. युएईने दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या हवाई संरक्षण यंत्रणा सध्या इराणकडून येणारी क्षेपणास्त्रे आणि ड्रोन हवेतच नष्ट करत आहेत. युएई सरकारनेही आपल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. अमेरिकेने इराणमधील लष्करी तळांवर केलेल्या कारवाईनंतर इराणने थेट आखाती देशांवर मोर्चा वळवल्यामुळे या भागात आता थेट युद्ध सुरू होण्याची भीती निर्माण झाली आहे.

## गोशाळा अनुदानात ३५० कोटींचा भ्रष्टाचार : संजय राऊत





तभा वृत्तसेवा

मुंबई : धर्माच्या नावाखाली भाजपकडून लूट सुरू आहे. राजस्थानमध्ये गोशाळांच्या अनुदानात ३५० कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे. मृत गाईंवर यांनी अनुदान घेतलं. मृत गोमातेच्या टाळूवरचं लोणी भाजपचे लोक खात आहेत, असा गंभीर आरोप करत, धर्माच्या नावाखाली लूट सुरू असताना सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरचिटणीस दत्तात्रय होसबाळे काय करत आहेत? असा सवाल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज माध्यमांशी बोलताना केला.नाशिकमधील सर्व कामे गुजरातच्या ठेकेदारांनानाशिकमधील तपोवनात वृक्षतोड करण्यात आली. प्रभू श्रीरामांचे वास्तव्य तिथे झाले होते. पर्यावरणप्रेमींनी तिथे आंदोलन केले, तरीही बेफाम पद्धतीने देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने गिरीश महाजन यांनी वृक्षतोड केली आहे. शतकातला सगळ्यात मोठा भ्रष्टाचार या ठिकाणी सुरू आहे. सगळे गुजरातचे ठेकेदार आहेत, त्यांनाच सर्व कामे देण्यात आली आहेत, असा पुनरुच्चारही त्यांनी केला.देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आहेत, अधूनमधून ते विधानभवनात हिंदीत भाषण करत असले तरी महाराष्ट्रात मराठीच चालेल. राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांच्या मनात थोडी जरी मराठी भावना जागृत असेल तर ते कारवाई करतील. नरेंद्र मोदी यांना वाटत असेल की केंद्रात देवेंद्र फडणवीस योग्य आहेत, तर नक्कीच त्यांना दिल्लीत घेतले जाईल, महाराष्ट्र त्यांच्या हातात राहणार नाही. आता महाराष्ट्र गुंडांचे राज्य झाले आहे, फडणवीस दिल्लीत जातील, असे भाकीतही राऊतांनी केले.

## पाणी कपात टळली

पुणे : पालखी सोहळ्याच्या मुक्कामामुळे पुण्यातील दिवसाआड पाणीकपात स्थगित करण्यात आली होती. मात्र, दरम्यानच्या काळात झालेला पाऊस व धरणसाठ्यात झालेली मोठी वाढ लक्षात घेता पुणे महापालिकेने तूर्त पाणीकपात लागू न करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे पुणेकरांना काहीसा दिलासा मिळणार आहे.

यंदाच्या वर्षी 'एल निनो' सक्रिय असल्याने पर्जन्यमान कमी राहण्याचा इशारा हवामान विभागाने पूर्वीच दिला आहे. पुणे शहराला प्रामुख्याने खडकवासला धरणसाखळीतून पाणीपुरवठा केला जातो. या धरणातील एकूण पाणीसाठा चार अब्ज घनफूटांपेक्षाही (टीएमसी) कमी झाला होता. त्यामुळे तातडीने पाणीकपात लागू करण्याच्या सूचना जलसंपदा विभागाने पुणे महापालिकेला केल्या होत्या. मात्र, पावसामुळे धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाल्याने ही पाणीकपात टळली आहे.

## लैंगिक छळाची तक्रार

बंगळुरू : परवानगीशिवाय फ्लॅटमध्ये घुसून आणि वॉशरूम वापरण्याच्या बहाण्याने लैंगिक छळ केल्याचा आरोप प्रकरणी पोलिसांनी एका डिलिव्हरी एजंटला अटक केली आहे. विजय मल्लिकार्जुन कामथ असे त्याचे नाव आहे. या प्रकरणी महिलेने केलेल्या तक्रारीवरून मराठहल्ली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

महिलेने सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे. यामध्ये तिने आरोप केला आहे की, डिलिव्हरी बॉय पार्सल देण्यासाठी माझ्या घरी आला. त्यानंतर त्याने मला वॉशरुम वापरू देण्याची विनंती केली. मी अनोळखी व्यक्तींना घरात प्रवेश देत नाही, असे सांगत त्याच्या विनंतीला स्पष्ट नकार दिला. शेजारी राहणाऱ्या पुरुषांची मदत घेण्याचा सल्लाही दिला. मात्र, माझ्या विरोधाकडे दुर्लक्ष करून, त्याने आपल्या चपला बाहेर काढल्या आणि माझ्या संमतीशिवाय तो थेट घरात घुसला.

## बंगालच्या उपसागरात रिश्टर स्केलवर ४.५ तीव्रतेचा भूकंप

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यापासून दूर बंगालच्या उपसागरात रविवारी पहाटे ४.५ रिश्टर तीव्रतेचा सौम्य भूकंप झाला. या भूकंपाचे धक्के विशाखापट्टणम शहरातील अनेक भागांत जाणवले. मात्र, या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याची माहिती मिळालेली नाही. दिलासादायक बाब म्हणजे भूकंपाचा परिणाम मर्यादित राहिला आणि कोणतीही मोठी आपत्ती किंवा जनहानी झाली नाही.भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्र (इन्कॉइस) यांच्या माहितीनुसार, रविवारी सकाळी ५ वाजून ५ मिनिटे ४६ सेकंदांनी (भारतीय प्रमाणवेळेनुसार) भूकंपाची नोंद झाली.



रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता ४.५ इतकी होती. भूकंपाचे केंद्र बंगालच्या उपसागरात आंध्र प्रदेशातील काकीनाडा किनाऱ्यापासून सुमारे २२५ किलोमीटर अंतरावर होते. त्याचे केंद्रबिंदू १६.८०५ अंश उत्तर अक्षांश आणि ८४.३८१ अंश पूर्व रेखांश येथे, समुद्रसपाटीपासून १० किलोमीटर खोलीवर स्थित होते.समुद्राच्या आत कमी खोलीवर होणाऱ्या भूकंपांवर तज्ज्ञ सातत्याने लक्ष ठेवून असतात, कारण अशा भूकंपांमुळे काही वेळा सुनामीचा धोका निर्माण होऊ शकतो. तथापि, या भूकंपानंतर सुनामीसंदर्भात कोणतीही इशारा सूचना जारी करण्यात आलेली नाही. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, भूकंपाचे सौम्य धक्के विशाखापट्टणम शहरातील अनेक भागांत जाणवले. सकाळी अचानक झालेल्या कंपनामुळे काही नागरिकांनी घरांबाहेर आणि इमारतीबाहेर पडणे सुरक्षित समजले, तर अनेकांनी सामाजिक माध्यमांवर आपले अनुभवही शेअर केले.मात्र, धक्क्यांची तीव्रता कमी होती आणि ते केवळ काही सेकंदच जाणवले. त्यामुळे कोणतीही घबराट, गोंधळ किंवा चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली नाही.प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, भूकंपामुळे कोणतीही जीवितहानी, दुखापत, मालमत्तेचे नुकसान किंवा इतर प्रकारची हानी झाल्याची नोंद नाही. स्थानिक प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले असून, खबरदारीचा उपाय म्हणून संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सध्या संपूर्ण परिसरात परिस्थिती सामान्य आहे.

## पाऊस जोरदार कमबॅक करणार

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : राज्यासह देशात सध्या पावसाने ब्रेक घेतला आहे. अनेक ठिकाणी कोरडे हवामान आहे. असं असलं तरी भारतीयांसाठी एक गुडन्यूज आहे. भारतात पुन्हा मान्सून सक्रिय होणार आहे. प्रशांत महासागरात पावसाला पूरक असं वातावरण बनत असल्याची माहिती समोर येत आहे. पावसासाठी पूरक असणारी ही सिस्टीम बंगालच्या खाडीपर्यंत पोहोचल्यास देशात पावसाला पुन्हा सुरुवात होण्याची शक्यता आहे. मध्य आणि उत्तर भारतात यंदा अपेक्षित असा पाऊस अजूनही झालेला नाही. त्यामुळे प्रशांत महासागरात तयार होणारी सिस्टीम यशस्वीपणे बंगालच्या खाडीपर्यंत पोहोचली तर वातावरणात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. देशात पूर्व भारतात पाऊस पडत आहे. पण तरीही पश्रि्चम, उत्तर आणि मध्य भारतात अपेक्षित पाऊस पडताना दिसत नाही. इथल्या नागरिकांना अजूनही उकाड्याचा सामना करावा लागत आहे. अनेकांना दुष्काळ पडणार असल्याची भीती आहे. प्रशांत महासागरात सुरु असलेले वातावरणातील बदल हे भारतीयांसाठी आशेचा किरण बनत आहेत. प्रशांत महासागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होत आहे. ही सिस्टीम पश्रि्चमेकडे आली आणि बंगालच्या खाडीत प्रवेश केला तर मान्सूनला पूरक असं वातावरण निर्माण होण्याची शक्तता आहे. हवामानाचे संशोधन करणाऱ्या वेगवेगळ्या संस्थांनी याबाबतचे अंदाज वर्तवले आहेत एउथऋ, ऋऌड आणि खचऊ यांनी या मॉडलच्या संभाव्यतेबद्दल दावा केला आहे.

## उघड्यावर लघुशंका कराल तर सावधान


गौहाटी : स्थानिक प्रशासनाकडून स्वच्छतेसंबंधी जागरूकता केली तरी नागरिकांकडून त्याचे पालन होतेच असे नाही. अनेक लोकांकडून उघड्यावरच लघुशंका करणे किंवा थुकणे यासारखे प्रकार केले जातात. यामुळे परिसरात अस्वच्छता रोगराई पसरण्याची भीती असते. त्यामुळे अशा लोकांना सरळ करण्यासाठी स्थानिक प्रशासनाने मोठे पाऊल उचलले आहे.

आसाममधील तिनसुकिया नगरपालिकेने सार्वजनिक ठिकाणी घाण करणारे आणि उघड्यावर लघुशंका करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी 'हॉल ऑफ शेम' ही मोहीम सुरू केली आहे. या उपक्रमाअंतर्गत नियम मोडणाऱ्यांचे व्हिडिओ शहरातील मोठ्या डिजिटल डएऊ स्क्रीनवर दाखवले जात आहेत. नागरिकांमध्ये स्वच्छता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

## होर्मुझमध्ये व्यापारी जहाजावर इराणचा हल्ला; ११ भारतीयांपैकी एक खलाशी बेपत्ता

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : ओमानच्या किनाऱ्याजवळ होर्मुझ सामुद्रधुनीत सायप्रसच्या ध्वजाखालील 'जीएफएस गॅलेक्सी' या व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्याचा भारताने तीव्र निषेध केला आहे. या जहाजावर ११ भारतीय नागरिक कार्यरत होते. त्यापैकी १० जणांची सुरक्षित सुटका करण्यात आली असून, एका भारतीय खलाशाचा अद्यापही शोध सुरू आहे.



परराष्ट्र मंत्रालयाने रविवारी जारी केलेल्या निवेदनात सांगितले की, ओमानमधील भारतीय दूतावास स्थानिक प्रशासनाच्या सतत संपर्कात असून शोध आणि बचाव मोहिमेवर बारकाईने लक्ष ठेवत आहे.या कारवाईसाठी सहकार्य केल्याबद्दल भारताने ओमान सरकारचे आभारही मानले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, जहाजावर झालेल्या हल्ल्यानंतर भीषण आग लागली. परिस्थिती गंभीर झाल्याने कर्मचाऱ्यांना जहाज सोडावे लागले. इराणने हा हल्ला इशारा देण्यासाठी केलेली कारवाई असल्याचा दावा केला असून, जहाज होर्मुझ सामुद्रधुनीतील कथित अनधिकृत मार्गाने प्रवास करत असल्याचे म्हटले आहे. तसेच या घटनेवर कोणतीही प्रत्युत्तरात्मक कारवाई झाल्यास त्याला कठोर उत्तर दिले जाईल, असा इशाराही इराणने दिला आहे.या घटनेमुळे इराण आणि अमेरिकेमधील तणाव आणखी वाढला आहे. प्रत्युत्तरादाखल अमेरिकेने इराणमधील क्षेपणास्त्र आणि ड्रोन तळ, नौदलाची साधने, दारुगोळा साठे, दळणवळण यंत्रणा आणि किनारी देखरेख केंद्रांवर नव्या हवाई कारवाया केल्या. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनुसार, ताज्या कारवाईत सुमारे १४० लष्करी लक्ष्यांवर हल्ले करण्यात आले असून, सलग तीन दिवसांत ३०० हून अधिक लक्ष्यांवर प्रहार करण्यात आला आहे.

## कल्याणमध्ये इमारत कोसळली

तभा वृत्तसेवा

ठाणे : कल्याणमध्ये इमारत कोसळल्याची मोठी दुर्घटना घडली आहे. अगदी पत्त्यांच्या बंगल्यासारखी ही भलीमोठी इमारत कोसळली आहे.सुदैवाने या इमारत दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. ही इमारत रि-डेव्हलपमेंटला गेली होती. टप्प्याटप्प्याने तिचं पाडकाम केलं जात होतं. पण दुपारच्या सुमारास ही इमारत अगदी पत्त्यांच्या बंगल्यासारखी कोसळली. या इमारतीत कुणीही वास्तव्यास नव्हतं. त्यामुळे सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. पण या इमारतीचा मलबा थेट रस्त्यावर देखील आला. यावेळी रस्त्याने जाणारी कुठली गाडी नसल्याने कुणालाही दुखापत झाली नाही. घटना घडली तेव्हा बाजूला राहणाऱ्या नागरिकांनी जीव मुठीत घेत घरातून बाहेर निघण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी थेट खिडकीतून घरातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने त्यात त्यांना यश आले. त्यामुळे ते या घटनेत बचावल्याची चर्चा आहे.

## मुंबईतील दोन महत्त्वाच्या उड्डाणपुलांच्या कामांना वेग





तभा वृत्तसेवा

मुंबई : मुंबईतील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महापालिकेकडून दोन नव्या पुलांचं काम सुरू होतं. शहरात विद्याविहार रेल्वे उड्डाणपूल आणि मानखुर्द महाराष्ट्र नगर पुलाचं काम वेगाने सुरू असून या दोन्ही प्रकल्पांसाठी डेडलाइन दिली आहे. अनेक काळापासून प्रलंबित पुलांचं काम पूर्ण झाल्यावर विद्याविहार आणि शीव-पनवेल महामार्गावर वाहतूक कोंडी फुटणार आहे. मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (प्रक्लप) अभिजीत बांगर यांनी शनिवारी दोन्ही प्रकल्पांची पाहणी केली आणि त्यावेळी ही अपडेट दिली. तब्बल ३५ वर्षांची प्रतीक्षा संपणार असून, विद्याविहार रेल्वे उड्डाणपुलाचं काम ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले आहेत. या पुलाचं तब्बल ८०% टक्के काम पूर्ण झालं आहे. विद्याविहारमध्ये पूर्व ते पश्रि्चम प्रवास करताना तब्बल ४० ते ४५ मिनिटं वेळ जातो. पण या पुलाचं काम पूर्ण होताच विद्याविहार पूर्व ते पश्रि्चम प्रवास १० ते १५ मिनिटांत करणं शक्य होणार आहे. या उड्डाणपूल ६५० मीटर लांब असून पूर्वेतील लाल बहादूर शास्त्री मार्गाला (डइड ठेरव) पश्रि्चमेतील रामकृष्ण चेंबूरकर मार्गाशी जोडणार आहे. थेटमध्य रेल्वेच्यारुळांवर हा पूल उभारला आहे. या पुलासाठी पहिला प्रस्ताव महापालिकेकडे १९९१ मध्ये मांडला होता. त्यानंतर २०१६ मध्ये प्रकल्पासाठी निविदा काढण्यात आली आणि मग बांधकाम सुरू झालं. पण त्यानंतरही अनेक अडथळ्यांमुळे प्रकल्पाच्या बांधकामाला विलंब झाला. विद्याविहार पुलासाठी १७८ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. १०० मीटर उंच स्टील गर्डरवर मार्ग बांधला आहे. या मार्गाच्या बांधकामादरम्यान तब्बल २१३ झाडं बाधित होणार होती, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यापैकी ७७ झाडं तोडण्यात आली, ८५ झाडांचं पुनर्रोपन करण्यात आलं आणि ५१ झाडं जागेवरचं असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. वाहनचालकांसह पादचाऱ्यांसाठी उड्डाणपुलापासून रेल्वे स्थानकांच्या पदपथापर्यंत मार्ग मिळणार आहे.

## परिवहन मंत्र्यांनाच बसमधून उतरवले!

बंगळुरू : कर्नाटकराज्याचे परिवहन मंत्री बैरथी सुरेश यांनी शनिवारी रात्री कोणत्याही सुरक्षेशिवाय, छुप्या वेषात एका सामान्य प्रवाशासारखा बेंगळुरूच्या 'बीएमटीसी' बसने प्रवास केला. त्यादरम्यान कंडक्टरने सुट्ट्या पैशासाठी त्यांना बसच्या खाली उतरवल्याचा प्रकार घडला .

या छुप्या तपासणी दरम्यान मंत्र्यांचा सामना प्रवाशांच्या नेहमीच्या समस्येशी झाला. हेब्बाल ते नागशेट्टीहल्ली या मार्गावरील बसने प्रवास करत असताना त्यांनी तिकीट काढण्यासाठी बस कंडक्टरकडे १०० रुपयांची नोट दिली. मात्र, वाहकाने सुट्टे पैसे नसल्याचे कारण सांगत त्यांना तिकीट देण्याऐवजी थेट बसमधून उतरण्यास सांगितले.

## देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन सज्ज, पंतप्रधान मोदी लवकरच दाखवणार हिरवा झेंडा !

वृत्तसंस्था

हरीयाना : भारतीय रेल्वे लवकरच देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन सुरू करणार आहे. इतिहासात पहिल्यांदाच देशात हायड्रोजन या इंधनावर चालणारी ट्रेन सुरू होणार असून स्वच्छ आणि हरित पर्यायांचा वापर होणार आहे. जिंद हरियाणा येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १७ जुलै रोजी या ट्रेनला हिरवा कंदील दाखवण्यात येणार आहे. उत्तर रेल्वेच्याजिंद-सोनीपत मार्गावरहायड्रोजन ट्रेन धावणार आहे. भारतीय रेल्वेच्या नव्या पिढीची सुरुवात या ट्रेनसह होणार हे. डिझेल, कोळसा किंवा वीज या सर्व पर्यायांसह आणखी एक पर्याय उपलब्ध झाला आहे. मे महिन्या रेल्वे मंत्री अश्रि्वनी वैष्णव यांच्या हस्ते या प्रकल्पाला मंजुरी मिळाली होती. रेल्वे प्रशासनाने १,२०० किलोवॅट हायड्रोजन प्रोप्लशन सिस्टिमसह १० डब्यांच्या स्वदेशी हायड्रोजन ट्रेन सेटला मंजुरी दिली होती. ताशी ७५ किमी वेगाने ही ट्रेन धावणार आहे.जिंद आणि सोनिपतदरम्यान ९० किमी लांब मार्गावर ही ट्रेन धावणार आहे. एका वेळी या ट्रेनमध्ये ६८२ प्रवासी हाताळण्याची क्षमता असेल. हायड्रोजन इंधनावर चालणाऱ्या ट्रेनची चाचणीसाठी पायलट प्रोजेक्ट म्हणून या मार्गाची निवड करण्यात आली आहे. तिकिटांचे दर ५



रुपयांपासून २५ रुपयांपर्यंततिकीट दरअसण्याची शक्यता आहे. त्यामुळे खिशाला परवडणाऱ्या दरात नागरिकांना हायड्रोजन ट्रेनने प्रवास करता येणार आहे. यामुळे ९० किलोमीटर अंतर केवळ दोन तासांत पार करता येणार आहे. या मार्गावर एकूण १२ थांबे असतील. रेल्वेच्या अधिकृत घोषणेनुसार हायड्रोजन ट्रेन क्रमांक ७४010 जिंद रेल्वे स्थानकातून सकाळी ७.४० वाजता रवाना होणार असून सोनिपत येथे ९.४० वाजता दाखल होणार आहे. यादरम्यान या मार्गावर जिंद सिटी, पांडू पिंडारा, ललित खेडा, भांबेवा, ईशापूर खेरी, बुटाना, खंडराई, गोहाना, राभरा, लाठ, मोहना हरियाणा आणि बरवसिनी अशी १२ स्थानकं असतील. ट्रेनच्या परतीच्या प्रवासात हायड्रोजन ट्रेन क्रमांक ७४00९ सोनिपतहून सकाळी १०.४० वाजता रवाना होणार आहे. दुपारी १ वाजता जिंदला पोहचेल. १७ जुलैपासून विशेष सेवा म्हणून सुरू होणार आहे. प्रवाशांसाठी ही सेवा कधीपासून सुरू होणार आहे याची अधिकृत घोषणा केली नाही. उत्तर रेल्वे याबद्दल अधिकृत माहिती जाहीर करणार आहे. पहिली तीन महिने या ट्रेनमध्ये एक प्रशिक्षित कर्मचारी असेल. तांत्रित अडचणी दूर करण्यासाठी हे तज्ज्ञ उपस्थित असतील.हायड्रोजन ट्रेनची सेवा लवकरच देशातील आणखी अनेक मार्गांवर विस्तारली जाणार आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ओबीसी महामंडळाच्या कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जुलै : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ व त्याअंतर्गत कार्यरत १४ महामंडळांच्या वतीने ओबीसी समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी आणि सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी विविध कर्ज योजना राबवल्या जात आहेत.

यामध्ये १ लाखांपर्यंतची थेट कर्ज योजना, २० टक्के बीज भांडवल, तसेच वैयक्तिक, गट, शैक्षणिक व महिला स्वयंसिद्धी कर्ज व्याज परतावा योजनांचा समावेश आहे. पात्र उमेदवारांनी या कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा व्यवस्थापक एस. एन. झुंजारे यांनी केले आहे.



## विविध वृत्त....

### बोगस शाळांचा शोध घेण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जुलै : जिल्ह्यात बोगस शाळा कार्यरत आहेत का? याचा शोध घेण्याची मागणी सामाजिक व विद्यार्थी संघटनांतून होत आहे. गतवर्षी बोगस शाळा आढळल्याने मोठी खळबळ माजली होती. माध्यमिक शिक्षण विभागाला कारवाई करावी लागली. यावर्षीही बोगस शाळांचा शोध घ्यावा. काही ठिकाणी बोगस शाळा कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

माध्यमिक शिक्षण विभागाने जिल्हा परिसरात कुठे बोगस शाळा सुरू आहेत का? याचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण, गावोगाव इंग्रजी माध्यमाच्या पीजी, केजी व स्कूल सुरू आहेत. या स्कूलनी शिक्षण विभागाची रितसर परवानगी घेतली आहे का? याचा शोध घ्यावा. ग्रामीण भागात खाजगी इंग्रजी माध्यम शाळांचे पीक फारच फोफावले असून, यात विद्यार्थी, पालकांची फसवणूक होऊ नये; पर्यायाने, शैक्षणिक नुकसान होऊ नये, अशी भूमिका सामाजिक व विद्यार्थी संघटनांनी मांडली आहे. माध्यमिक शिक्षण विभागाने जिल्ह्यात कुठे बोगस शाळा आहेत का? याचा शोध घ्यावा. कारण, १५ जूनला शाळा सुरू होण्याच्या तोंडावर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने पत्र काढून पालकांनी आपल्या पाल्यास प्रवेश देताना शाळा अधिकृत नोंदणी झालेली आहे का? हे पाहण्याचे आवाहन केले होते. यासंदर्भात, पालकांनी जागरूक राहून प्रवेश घेतले का? हे सुद्धा शिक्षण विभागाने पाहण्याची गरज आहे. शिक्षण विभागानेही शोध घेऊन बोगस शाळांची माहिती प्रसारित करावी, अशी मागणी होत आहे.

### श्री खाटू श्याम मंदिरात भजन

लातूर दि. १२ जुलै : योगिनी एकादशीच्या निमित्ताने शहरातील कव्हा नाका परिसरापासून जवळच असलेल्या कोलू रोड येथील श्री खाटू श्याम मंदिरात शुक्रवारी, दि. १० जुलै रोजी सायंकाळी भक्तिमय भजन संध्या पार पडली. यावेळी टाळ-मृदंगाच्या गजरात आणि सुमधुर भजनांच्या तालावर भाविक तल्लीन झाले होते. संपूर्ण मंदिर परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता.

# लातूर येथे सहकार संकुल इमारतीचे भूमिपूजन उत्साहात

## सहकार क्षेत्राला बळकटी देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध : बाबासाहेब पाटील



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १२ जुलै : सहकार चळवळ ही आपल्या राज्याची वेगळी ओळख आहे. राज्यातील लाखो संसार सहकारामुळे उभे राहिले आहेत. बदलत्या काळानुसार सहकाराचे स्वरूप बदलत असून या क्षेत्राला अधिक बळकट करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले. तसेच, सहकार चळवळीने ग्रामीण भागासह संपूर्ण राज्याच्या प्रगतीला मोठा हातभार लावला आहे. सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या लातूर जिल्ह्यातील सहकारी संस्था व बँकांना अधिक सक्षम करण्यासाठी आणि सहकार विभागाच्या सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध होण्यासाठी 'सहकार संकुल' उपयुक्त ठरेल, असा विश्र्वास पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी व्यक्त केला.

लातूर येथे सहकार संकुल इमारतीचे भूमिपूजन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील अध्यक्षतेखाली आणि लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला विधान परिषद सदस्य तथा मुख्य प्रतोद आमदार विक्रम काळे, जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील तळेगावकर, लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, नगरसेवक विक्रांत गोजमगुंडे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, समाज कल्याण सभापती उत्तम माने, अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सूरज पाटील, विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण, जिल्हा उपनिबंधक व्ही. एल. पोतंगले, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता रूपा राऊळ, अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी यावेळी उपस्थित होते.

सहकार चळवळीमुळे आजवर राज्यात मोठा रोजगार निर्माण झाला. असून ही चळवळ जिवंत राहणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील सहकारी चळवळीचे माध्यम असलेल्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना केवळ पारंपारिक व्यवसायापुरते मर्यादित न ठेवता, त्यांच्या माध्यमातून किराणा दुकानांपासून ते जेनेरिक औषध दुकानांपर्यंत विविध नवे उद्योग व व्यवसाय सुरू करण्याची परवानगी शासनाने दिली आहे. यामुळे सहकार क्षेत्रातून रोजगाराची नवनवीन दालने खुली होणार आहेत. बदलत्या काळात सहकार क्षेत्रात अमूलाग्र बदल होत असून, राज्याला १ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्यात सहकार चळवळ महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्र्वास सहकार मंत्री श्री. पाटील यांनी व्यक्त केला. राज्य शासनाने आणलेल्या अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच लातूर येथे उभारण्यात येणारे सहकार संकुल हे लातूरच्या वैभवात भर घालणारे आणि सहकार चळवळीला अधिक सक्षम करणारे ठरेल, असेही ते म्हणाले.

सहकार चळवळ बळकट करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालय सुरु करून केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या माध्यमातून शेतकरी व सहकारी संस्थांच्या हिताचे मोठे निर्णय घेतले आहेत. महाराष्ट्राला सहकाराची समृद्ध परंपरा आहे. राज्य शासनही सहकार चळवळीच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करीत आहे. याचाच एक भाग म्हणून राज्यात सहकार संकुल उभारून सहकार विषयक विविध कार्यालये एकाच छताखाली आणण्याचे काम सुरू आहे. सहकारी संस्थांसाठी सर्व सेवा एकाच ठिकाणी मिळणार असून यामुळे वेळेची बचत आणि सेवांमध्ये सुलभता निर्माण होईल. संकुलाचे काम दर्जेदार, गुणवत्तापूर्ण झाले पाहिजे. कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यावेळी म्हणाले.

राज्य शासनाने आतापर्यंतची सर्वात मोठी शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. या योजनेतील काही अटी वगळण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली असून, याचा लाभ लाखो शेतकऱ्यांना होईल, असा विश्र्वास पालकमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

शेतकऱ्यांना आधार देणाऱ्या सहकारी संस्थांसाठी उभारण्यात येणारे सहकार संकुल वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावे, असे आमदार विक्रम काळे यावेळी म्हणाले.

प्रास्ताविक विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी केले. सहायक निबंधक गडेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## स्वार्थी पत्रकारांपासून सावध राहण्याचे आवाहन



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. १२ जुलै : गेल्या काही दिवसापासून रेणापूर शहरासह तालुक्यातील काही पत्रकार आम्ही सगळे एक आहोत असे भासवून पत्रकारितेचा गैरवापर करून पत्रकारिता क्षेत्राला अशोभनीय कार्य करीत आहेत तेव्हा पत्रकारितेला बदनाम करणाऱ्या अशा स्वार्थी पत्रकारापासून अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि व्यवसायिकांनी सावध राहावे असे आवाहन रेणापूर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नामदेव शिंदे यांनी केले आहे.

रेणापूर तालुक्यातील पत्रकार एक आहेत असे भासवून काही पत्रकार स्वतःच्या हितासाठी आर्थिक व साहित्याची मागणी करीत असल्याचे प्रकार रेणापूर तालुक्यातील विविध कार्यालय चर्चिले जात आहेत याबाबत रेणापूर येथील ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल कटके यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील पत्रकाराची तातडीची बैठक होऊन सविस्तर चर्चा झाली.

पत्रकाराकडून समाजाच्या मोठ्या अपेक्षा असताना काही पत्रकार वैयक्तिक स्वार्थासाठी सर्व पत्रकार सोबत आहेत, असे दर्शवून स्वतःचे हित साधत असतील तर ही बाब अत्यंत निंदनीय आहे. अशा प्रकारची पत्रकारिता गेल्या काही दिवसापासून रेणापूर तालुक्यात बोकाळली असून अशा प्रकारास सर्वच पत्रकार सहमत नाहीत. तेव्हा रेणापूर तालुक्यातील अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि व्यवसायिकांनी जागृत राहून अशा पत्रकारापासून अलिप्त रहावे असेही आवाहन नामदेव शिंदे यांनी केले आहे. या बैठकीस रफिक शिकलकर, चंद्रकांत कातळे, सिद्धार्थ चव्हाण, शेख निजाम, गंगासिंह कदम, बालाजी कटके, ईश्र्वर बद्दर, कोंडीराम काळे, भरत भोसले, आर डी अपसिंगेकर यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.

## अ.भा. भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने लातूर आरटीओ कार्यालयावर भव्य मोर्चा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जुलै : लातूर आरटीओ कार्यालयाच्या अधिकाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या भ्रष्टाचार व चुकीच्या कारवाईच्या निषेधार्थ अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्या नेतृत्वाखाली डोक्यावर एका टोपल्यात दोन कोंबड्या, दारूच्या बाटल्या व चिल्लर पैसे घेऊन भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आरटीओ कार्यालयाकडून वाहनधारकांची केली जाणारी अडवणूक व आर्थिक लुट थांबविण्यात यावी अशी मागणी वारंवार करूनही संबंधित विभागाचे अधिकारी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याच्या निषेधार्थ डोक्यावर एका टोपल्यात दोन कोंबड्या, दारूच्या बाटल्या व चिल्लर पैसे घेऊन हा आगळा वेगळा मोर्चा काढण्यात आला.

मोर्चात सहभागी झालेल्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करून वाहनधारकांची अडवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांची गाढवावरून धिंड काढण्याची जाहीर धमकी दिल्यामुळे भेदरलेला एकही अधिकारी मोर्चास सामोरा आला नाही. त्यामुळे संतप्त मोर्चेकऱ्यांनी तब्बल दोन तास आरटीओ कार्यालयासमोर ठिय्या धरला. शेवटी पोलीस अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून आरटीओ अधिकाऱ्यांना मोर्चासमोर आणले. त्यावेळी अध्यक्ष खंडापूरकर यांनी अधिकाऱ्यांना एक महिन्यात कामकाजात सुधारणा नाही केल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा इशारा दिला.

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने आयोजित केलेल्या या मोर्चामुळे बराच काळ आरटीओ कार्यालय परिसरातील वातावरण तणावपूर्ण बनले होते. या मोर्चात राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर बाबा यांच्यासह राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य पृथ्वीराजसिंह पाटील खंडापूरकर, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा विधी विभाग एड. राणीताई स्वामी, राष्ट्रीय सरचिटणीस अमोल नानजकर काशीबाई हांडे, शिवा काळे, नेताजी जाधव, पृथ्वीराज पवार, नागेश जाधव, सुनील शिंदे, अजय राठोड, किरण मुंडे, रामभाऊ जवळगे, अमोल भालेराव, वैभव घोबाळे, रेखा खंदाडे, साक्षी भातलवंडे ,विशाखा हातागळे , संकेत भोसले, शितल तमलवार, सुनील कदम, महेश पाटील, यांसह परभणी, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, सोलापूर जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते, वाहनधारक - वाहन चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रोटरी क्लब दिव्यांगांसह पर्यावरण, आरोग्याच्या उपक्रमांवर देणार भर : डॉ. गोरे



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जुलै : रोटरी वर्ष २०२६-२७ मध्ये आंतरराष्ट्रीय रोटरीकडून प्राप्त झालेले विविध उपक्रम यशस्वीरीत्या राबवण्याचे नियोजन असून दिव्यांग, पर्यावरण, शेती, शिक्षण, आदिशक्ती आणि आरोग्य यावर विशेष भर दिला जाईल. माझ्यासारख्या दिव्यांग व्यक्तीला अध्यक्षपदाची जी जबाबदारी दिली आहे, ती मी माझ्या कार्यकुशलतेने पूर्ण करण्याचा नक्कीच प्रयत्न करीन, अशी ग्वाही रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनचे नूतन अध्यक्ष डॉ. माधव गोरे यांनी दिली.

येथील भालचंद्र ब्लड बँकेमध्ये क्लबचा २०२६-२७ चा पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी आयपीडीजी सुधीर लातुरे, नूतन सहाय्यक प्रांतपाल डॉ. राजगोपाल तापडिया, मावळते अध्यक्ष डॉ. गुणवंत बिरादार आणि नूतन सचिव डॉ. घनश्याम ताडेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. यानंतर प्रा. आशिष क्षीरसागर यांनी

मावळते अध्यक्ष व सचिव यांना कॉलर प्रदान केले.

या वेळी सुधीर लातुरे यांनी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ मध्ये लातूर होरायझनने आपली वेगळी ओळख निर्माण केल्याचे सांगत मावळते अध्यक्ष डॉ. बिरादार यांच्या कार्याचे कौतुक केले. या कार्यक्रमात रो. विश्र्वनाथ निगुडगे, नरेश कोरे, रो. विजय कोळी, मनोज सूर्यवंशी, दत्ता बेडके आदींचा सत्कार करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय रोटरीचे कार्य जगभरातील तब्बल २१० राष्ट्रांमध्ये सुरू आहे. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चा विचार केल्यास, यामध्ये एकूण ११ महसुली जिल्ह्यांचा समावेश होतो. तसेच, लातूर शहरामध्ये सध्या एकूण ०६ रोटरी क्लब सक्रियपणे कार्यरत आहेत.

नूतन कार्यकारिणीचा पदभारः रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनच्या नूतन अध्यक्षपदी डॉ. माधव गोरे आणि सचिवपदी डॉ. घनश्याम ताडेवार यांनी अधिकृतरीत्या पदभार स्वीकारला.. विविध क्षेत्रांत कार्याचा संकल्पः आगामी वर्षात दिव्यांग कल्याण, पर्यावरण संरक्षण, शेती विकास, शिक्षण, महिला सक्षमीकरण (आदिशक्ती) आणि आरोग्य या क्षेत्रांत प्रभावी काम करण्याचे क्लबचे नियोजन आहे.

कार्यक्रमात लातूर शहरातील विविध रोटरी क्लबच्या अध्यक्ष व सचिवांसह मान्यवरांचा विशेष सत्कार करून त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला. मावळत्या अध्यक्षांचे कौतुकः मावळते अध्यक्ष डॉ. गुणवंत बिरादार यांनी वर्षभरात राबवलेल्या सामाजिक उपक्रमांबद्दल मान्यवरांनी त्यांची प्रशंसा करत डिस्ट्रिक्ट ३१३२ मधील कार्याचा गौरव केला.

## अनुसूचित जाती आरक्षणाचे दोन गटात उपवर्गीकरण करा : सचिन बगाडे



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जुलै : सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातीचे अ, ब, क, ड असे वर्गीकरण करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले आहेत. परंतु, आरक्षण वर्गीकरण कृती समितीने त्याचे दोन गटात उपवर्गीकरण करण्याची मागणी लातुरात आयोजित पत्रकार परिषदेत शनिवारी केली. यावेळी समितीचे निमंत्रक सचिन बगाडे, संयोजक अरविंद पाटोळे, नागेश गायकवाड आदी उपस्थित होते.

आरक्षण वर्गीकरण मुद्द्याला घेऊन बगाडे व त्यांचे सहकारी पुणे येथून संपूर्ण महाराष्ट्रात आपली भूमिका मांडत असून, त्यानुसार त्यांनी शनिवारी लातूर पत्रकार परिषद घेतली. पत्रकारांशी संवाद साधताना बगाडे म्हणाले, राज्यात अनुसूचित जाती सामाजिक शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या एकसंघ नसून त्या विविध स्तरांत विभागल्या आहेत. प्रत्यक्षात काही मोठ्या जातींनी आरक्षणाचा मोठा लाभ घेतला असून, मातंग व तत्सम जाती आजही सर्व क्षेत्रात मागे राहिल्या आहेत. त्यामुळे उपवर्गीकरण करणे काळाची गरज आहे. कर्नाटक सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर उपवर्गीकरणाची अंमलबजावणी केली आहे. विशेषतः हरियाणा राज्याने वंचित आणि अल्प प्रतिनिधित्व या निकषावर आधारित दोन गटांची प्रभावी रचना केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र सरकारने अनुसूचित जातींचे दोन गट उपवर्गीकरणात करणे आवश्यक आहे. त्यात वंचित अनुसूचित जाती आणि इतर अनुसूचित जाती असा त्याचा प्रवर्ग असावा, असे बगाडे यांनी सांगितले.

उपवर्गीकरणाची सविस्तर मांडणी करताना बगाडे म्हणाले,अनुसूचित जातीसाठी असलेल्या १३ टक्के आरक्षणापैकी सहा टक्के आरक्षण वंचित अनुसूचित जातीसाठी राखीव ठेवावे, उर्वरित सात टक्के आरक्षण इतर अनुसूचित जातीसाठी ठेवण्यात यावे. जर एका गटात पात्र उमेदवार उपलब्ध नसेल तर दुसऱ्या गटातील उमेदवारास संधी देण्यात यावी. शैक्षणिक प्रवेशात दोन्ही गटांना प्रत्येकी सहा टक्के आरक्षण लागू करावे. उपवर्गीकरणानंतर पहिली रिक्त जागा वंचित अनुसूचित जातीसाठी देण्यात यावी. आरक्षणाची दोन गटात विभागणी झाल्यानंतर समाजातील विषमता कमी करून खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय प्रस्थापित होईल, असा दावाही यावेळी बगाडे यांनी केला.

## जोरदार पावसापूर्वी शहरातील नालेसफाई करा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जुलै : पावसाळ्याच्या सुरुवातीच्या पावसानंतर लातूर शहरातील अनेक भागांत पाणी साचणे, नाल्या व गटारे तुंबणे, रस्त्यांवर चिखल व खड्डे निर्माण होणे, तसेच वाहतूक विस्कळीत होण्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात समोर आल्या आहेत. पुढील जोरदार पावसापूर्वी लातूर महानगरपालिका हद्दीतील सर्व १८ प्रभागांमध्ये नालेसफाई, पाणी निचरा, रस्ते दुरुस्ती आणि पावसाळी पूर्वतयारीची कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी आम आदमी पार्टीचे लातूर जिल्हाध्यक्ष आश्र्विन नलबले यांनी आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

ही समस्या केवळ काही भागांपुरती मर्यादित नसून संपूर्ण शहरातील प्रमुख रस्ते, अंतर्गत रस्ते, नाले, गटारे, ड्रेनेज लाईन्स आणि पाणी साचणारे संवेदनशील भाग यांची तातडीने पाहणी करणे आवश्यक असल्याचे नलबले यांनी म्हटले आहे. सध्या पाऊस नसला तरी पुढील जोरदार पावसापूर्वी कामे पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडे पुरेसा वेळ आहे. मात्र, ही कामे रखडल्यास पुन्हा पाणी साचणे, वाहतूक कोंडी, चिखल, खड्डे आणि अपघाताचा धोका निर्माण होईल, असेही त्यांनी नमूद केले.

या निवेदनावर आम आदमी पार्टीचे जिल्हा संघटक फिरोज शेख, जिल्हा संघटक मुकेश सोनवणे, महिला शहराध्यक्ष श्रीदेवी कोलेवाड, शहर सहसचिव इरशाद शेख तसेच इतर कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी 'विशेष सखोल पुनरीक्षण' मोहीम सुरू

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १२ जुलै : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लातूर जिल्ह्यामध्ये मतदारयादी अद्ययावत करण्यासाठी 'विशेष सखोल पुनरीक्षण' कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत सन २००२ च्या मतदार यादीशी सर्व मतदारांचे मॅपिंग करणे आवश्यक असून, जर मतदारांचे मॅपिंग झाले नाही तर त्यांना सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या वेळी मतदार नोंदणी अधिकाऱ्यांसमोरील सुनावणीच्या प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे. या कामासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी सर्व मतदार केंद्रस्तरीय अधिकारी व पर्यवेक्षकांना ०१ जुलै २०२६ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत पूर्णवेळ कामाकरिता कार्यमुक्त केले असून, अस्पष्ट फोटो गोळा करून अद्ययावत करणे व डीएसई नोंदींची पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत. या विशेष मोहिमेअंतर्गत मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) ३० जून २०२६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदारांच्या घरोघरी भेट देऊन माहिती संकलन आणि डिजिटायझेशनची कामे पूर्ण करणार आहेत. मतदारांना या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी सर्व बीएलओ रोज संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत आपापल्या मतदान केंद्रांवर उपस्थित राहणार आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### दोन दुचाकीच्या धडकेत एकाचा मृत्यू : दोनजण जखमी

**परभणी,/प्रतिनिधी :** मानवत तालुक्यातील खरबा-करंजी या रस्त्यावर शनिवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास दोन दुचाकींच्या समोरासमोरील धडकेत एका मोटारसायकलस्वाराचा मृत्यू झाला तर अन्य दोघे गंभीर जखमी झाले.

करंजी येथील नितीन जाधव (वय ३२) हे एम.एच. २२ ए.जी. ८५५४ या क्रमांकाच्या दुचाकीने वाहनातून करंजीकडे जात होते. तर झोडगांव येथील स्वप्निल विष्णुपंत पवार व रामा वामनराव पवार हे दोघे एम.एच. १६ डी.एन. ४०२४ या क्रमांकाच्या दुचाकीवरुन रुढी पाटीकडे जात होते. खरबा ते करंजी या दरम्यान या दोन मोटारसायकलची जोरदार धडक झाली. त्यात या दोन्ही वाहनावरील तीघेजण रस्त्यावर कोसळले. त्यात जाधव यांच्या डोक्यास गंभीर जखम झाली. प्रत्यक्षदर्शनींनी तात्काळ या तीघांना मानवतच्या रुग्णालयात हलवले खरे परंतु, वैद्यकीय अधिकाऱ्यांना जाधव यांना मृत घोषित केले. करंजी येथील जाधव यांच्या वडिलांचे चार वर्षांपूर्वी निधन झाले. त्यांच्या पश्चात वृध्द आई, पत्नी व दोन लहान मुली असा परिवार आहे. तरुण वयातच कुटूंबाचा आधारवड हरवल्याने करंजी या गावात शोककळा पसरली आहे. दरम्यान, स्वप्निल पवार व रामा पवार या दोघांना पुढील उपचाराकरीता परभणीच्या रुग्णालयात हलविण्यात आले असल्याची माहिती हाती आली आहे.

### गॅस सिलिंडरच्या टाक्यांची चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश : तिघांना अटक; चोरीतील मुद्देमाल व पिकअप वाहन जप्त

**परभणी,/प्रतिनिधी :** सेलू तालुक्यातील खवणे पिंपरी येथील इंडियन गॅस एजन्सीच्या गोदामातून गॅस सिलिंडरच्या टाक्यांची चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात पाथरी पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली असून चोरीतील मुद्देमालासह गुन्ह्यात वापरण्यात आलेले पिकअप वाहन जप्त करण्यात आले आहे.

खवणे पिंपरी येथील इंडियन गॅस एजन्सीच्या गोदामाचे कुलूप तोडून गॅस सिलिंडरच्या टाक्यांची चोरी करण्यात आल्याची घटना २६ मार्च रोजी घडली होती. याप्रकरणी पाथरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखा आणि पाथरी पोलिसांकडून या गुन्ह्याचा तपास सुरू होता. तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी राजेश पवार, गणेश काळे (रा. इंदिरानगर, पाथरी) आणि गौतम आदमाने (रा. सारोळा, ता. पाथरी) यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली.

पोलिसांनी आरोपींकडून चोरीस गेलेल्या १४ टाक्यांसह गुन्ह्यात वापरण्यात आलेले पिकअप वाहन जप्त केले. मुख्य आरोपी राजेश पवार हा पाथरी तालुक्यातील वाघाळा येथील सुनीता गॅस एजन्सीचा मालक आहे. दरम्यान, यापूर्वी या टोळीने घनसावंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुंभार पिंपळगाव परिसरातून गॅस सिलिंडरच्या जवळपास ६० टाक्यांची चोरी केल्याची माहिती तपासात समोर आली आहे.

दरम्यान, ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या आदेशानुसार अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले यांच्या नेतृत्वात व पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि अशोक जायभाय यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि नरके, पोलिस उपनिरीक्षक गणेश सवंडकर, पोलीस अंमलदार विलास सातपुते, रंगनाथ दुधाटे, विष्णू चव्हाण, मधुकर ढवळे, हनुमान ढगे, उत्तम हनवते, घुगे, बालाजी रेड्डी आणि गणेश कौटकर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

### बोरीत एका रात्रीत चार दुकानांवर चोरट्यांचा डल्ला : कृषी केंद्रासह तीन किराणा दुकाने फोडून ४० हजारांची रोकड लंपास; व्यापाऱ्यांत भीतीचे वातावरण

**जिंतूर,/प्रतिनिधी :** बोरी येथील बसस्थानक परिसरात अज्ञात चोरट्यांनी एका रात्रीत तीन किराणा दुकाने आणि एका कृषी केंद्राचे शटर फोडून गल्ल्यातील सुमारे ४० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना शुक्रवारी मध्यरात्रीनंतर उघडकीस आली. जिंतूर-परभणी महामार्गावरील वर्दळीच्या परिसरात झालेल्या या चोरीमुळे व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांसमोर चोरट्यांनी मोठे आव्हान उभे केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी दुकानांचे शटर आणि गल्ल्यांचे कुलूप तोडून चोरी केली. यामध्ये गोपाळ माने यांच्या स्वराज कृषी केंद्रातून ५ हजार रुपये, महादेव सोनटक्के यांच्या महादेव किराणा दुकानातून ५ हजार रुपये, माणिक भाग्यवंत यांच्या भाग्यवंत किराणा दुकानातून १५ हजार रुपये तसेच हर्षनंदन घोलप यांच्या घोलप किराणा दुकानातून १५ हजार रुपये अशी एकूण ४० हजार रुपयांची रोकड चोरून नेण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांच्या सूचनेनुसार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक महादेव गायकवाड तसेच बीट जमादार शेख वसीम, शेख मोबीन, राजेश जटाळ, श्रीराम दंडवते, कोकाटे आणि कांबळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक राम मुंजे यांच्या मार्गदर्शनाखाली श्वानपथक आणि ठसेतज्ज्ञ पथक घटनास्थळी दाखल झाले. मात्र श्वानपथकाला चोरट्यांचा माग काढण्यात यश आले नाही. दरम्यान, परभणी स्थानिक गुन्हे शाखेचे पांडुरंग तूपसुंदर, मुकेश बुधवंत, उमेश चव्हाण आणि राम पौळ हे सीसीटीव्ही फुटेज व इतर तांत्रिक बाबींच्या आधारे तपास करत आहेत. दरम्यान, या घटनेनंतर पोलिसांची रात्रीची गस्त, चोरीच्या वेळी परिसरातील वीजपुरवठा खंडित होणे तसेच पोलिसांना घटनास्थळी पोहोचण्यास झालेला विलंब याबाबत व्यापारी आणि नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन कारवाई करावी, अशी मागणी व्यापाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

### परभणीत वाढला उकाडा

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हयात मोठया प्रमाणात उकाडा वाढला आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी परभणी जिल्हयात उन्हाचा पारा मोठया प्रमाणात वाढला होता. त्यामुळे नागरिकांना उन्हाचा त्रास चांगलाच झाला होता. यावर्षी मान्सुचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे शेतकरी अद्यापही पेरणीच्या संकटातच आहे.त्याचा परिणाम शेतकऱ्यांना भोगावा लागत आहे. यावर्षी पावसाचे प्रमाण देखील कमी प्रमाणात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी यावर्षी पेरणीच्या बाबतीत घाई गडबड केली होती. तसेच पावसाचे प्रमाण जुलै महिन्याच्या मध्यापर्यंत कमी प्रमाणात आहे. त्यामुळे यावर्षी परभणी शहरासह जिल्हाभरातील तालुका उकाडा चांगलाच जाणवत आहे.

# वाढती लोकसंख्या जगासमोरील मोठे आव्हान - रोडे

## मराठवाडा हायस्कूलमध्ये जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त 'लोकसंख्या वाढीचे परिणाम आणि विज्ञान प्रयोगांद्वारे' विद्यार्थ्यांचे प्रबोधन

**परभणी ,/प्रतिनिधी:-** वाढती लोकसंख्या ही जगासमोरील गंभीर समस्या बनली असून अन्न, पाणी, निवारा, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि नैसर्गिक संसाधनांवर त्याचा मोठा ताण पडत आहे. लोकसंख्या वाढीमुळे पर्यावरणीय असमतोल, बेरोजगारी, प्रदूषण आणि संसाधनांची कमतरता यांसारख्या समस्या अधिक तीव्र होत आहेत, असे मत गोपाळ रोडे यांनी व्यक्त केले.

नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा हायस्कूलच्या शिवाजीनगर शाखेत शनिवार ११ जूलै राजी जागतिक लोकसंख्या दिन विविध प्रबोधनात्मक उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. लोकसंख्या वाढीचे परिणाम, संसाधनांचे महत्त्व आणि विज्ञानातील रंजक प्रयोगांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे पर्यवेक्षक सूर्यकांत पाटील होते. प्रमुख वक्ते म्हणून गोपाळ रोडे उपस्थित होते. यावेळी सहाय्यक पर्यवेक्षक सुनील रामपूरकर तसेच विज्ञान शिक्षक अविनाश कंधारकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख वक्ते गोपाळ रोडे यांनी 'जागतिक लोकसंख्या वाढ आणि तिचे परिणाम' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विषय अधिक प्रभावीपणे समजावून सांगण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांसमोर प्रात्यक्षिक सादर केले. एका बाटलीमध्ये टोमॅटो टाकून सुरुवातीला सर्व टोमॅटो सहजपणे मावत असल्याचे दाखवून दिले. मात्र संख्या वाढत गेल्यानंतर बाटलीतील जागा अपुरी पडू लागली. या प्रयोगाच्या माध्यमातून पृथ्वीवरील मर्यादित संसाधने आणि वाढती लोकसंख्या यांतील संबंध विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगण्यात आला. त्यांच्या या प्रयोगाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



यानंतर अविनाश कंधारकर, सूर्यकांत पाटील, विनोद लोलगे आणि राम बंडे यांनी विद्यार्थ्यांसाठी विज्ञानातील विविध प्रयोगांचे प्रात्यक्षिक सादर केले. लिंबाच्या रसाच्या साहाय्याने कागदावर लिहिलेला मजकूर अदृश्य होणे आणि उष्णता दिल्यानंतर पुन्हा स्पष्ट दिसू लागणे हा 'अदृश्य लिखाण' प्रयोग विशेष आकर्षणाचा ठरला. या प्रयोगामागील वैज्ञानिक कारणेही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाविषयीची जिज्ञासा आणि आवड अधिक वाढल्याचे दिसून आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी संसदेचे प्रमुख श्रीपाद कुलकर्णी यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिवप्रसाद कोरे यांनी केले. या कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकसंख्या वाढीचे गांभीर्य, संसाधनांचे संवर्धन आणि विज्ञानातील प्रयोगांचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती मिळाल्याने कार्यक्रम ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी ठरला.

## आडगांव येथील शेतकरी महिलेस जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणकडून मदत



**जिंतूर,/प्रतिनिधी-** मौजे आडगांव येथे दिनांक ०१/०७/२०२६ रोजी झालेल्या अतिवृष्टीसदृष्य पावसात गावाजवळील ओढ्यावर आलेल्या पुरात प्रवाहात आडगांव येथील शेतकरी महीला सौ मंगलबाई शेषराव खंडागळे या शेतातून घरी येत असतांना वाहून गेल्या होत्या व सदर घटनेत त्यांचा दुर्दे वी निधन झाले होते.

मौजे आडगांव येथील सदर घटनेतील मयत शेतकरी महीला सौ मंगलबाई शेषेराव खंडागळे यांच्या कुटूंबियांस माजी आमदार श्री रामप्रसादजी बोर्डीकर साहेब व पालकमंत्री नामदार सौ मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांच्या प्रयत्नातून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणकडून मदत करण्यात आली.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणकडून ही मदत आज महिलेचे पती श्री शेषेराव खंडागळे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली, यावेळेस उपस्थित ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार श्री रामप्रसादजी बोर्डीकर साहेब, जिंतूर तहसीलचे नायब तहसीलदार श्री प्रशांतजी राखे सर, मंडळ अधिकारी श्री विठ्ठल बडगुजर, आत्मारामजी पवार, माजी सरपंच मंचकराव खंडागळे, विश्वनाथ राऊत, काशिनाथ राऊत व सहकारी उपस्थित होते.

## ऑर्किड्स इंटरनॅशनल स्कूल मध्ये स्केटिंग - प्रात्यक्षिकाचे सादरीकरण



**जिंतूर ,/प्रतिनिधी- :** कार्यक्रमात सर्वप्रथम आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले व्यासपीठावर शाळेचे चेअरमन सिद्धार्थ सर, व्यवस्थापिका सोनल अच्छा मिस, मुख्याध्यापक श्री गजानन सर, त्याच बरोबर स्केटिंग कोच पुष्कर गजाननडहाके सर उपस्थित होते.

कार्यक्रमात सर्वप्रथम आलेल्या पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, तदनंतर कार्यक्रमास सुरुवात झाली. स्केटिंग कोच श्री पियुष घाडगे सर यांनी आपल्या विद्यार्थी टीम सह शाळेमध्ये येऊन शाळेतीलही काही विद्यार्थ्यांसोबत इतर विद्यार्थ्यांसमोर स्केटिंग चे प्रात्यक्षिक सादर केले. त्यामध्ये भव्या अच्छा वर्ग (२ री), मयूर कांबळे (वर्ग ८ वी), शुभम रोकडे (वर्ग ८ वी), साईराज घुले (वर्ग ८ वी) पियुष जाधव(वर्ग ३ री) इत्यादी विद्यार्थ्यांनी उत्कृष्टरित्या स्केटिंग चे प्रात्यक्षिक दाखवून शाळेतील विद्यार्थ्यांची मने जिंकली.

स्केटिंग खेळ हा मनाला तल्लख व त्याचबरोबर शरीराचे समतोल साधण्यास मदत करतो, हा खेळ विद्यार्थ्यांमध्ये रुजला पाहिजे असे प्रतिपादन श्री सिद्धार्थ सर यांनी व्यक्त केले. तर अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांनी खेळामध्ये सुद्धा आपले करिअर घडवावे, खेळ आपली आवड बनवावी असे मत शाळेचे मुख्याध्यापक श्री गजानन सर यांनी व्यक्त केले.

# सेलूत १.२८ लाखांहून अधिक मतदारांचे मॅपिंग पूर्ण; अनमॅप्ड व अनॉमली मतदारांची तपासणी युद्धपातळीवर

## मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेचा आढावा; अचूक मतदार नोंदींसाठी प्रशासनाच्या सूचना

**सेलू ,/प्रतिनिधी-** सेलू तालुक्यात एकूण १६५ मतदार यादी भाग असून १ लाख ४५ हजार ५९२ मतदारांची नोंद आहे. त्यापैकी १ लाख २८ हजार ५८० मतदारांचे बीएलओ पद्वारे मॅपिंग पूर्ण झाले आहे. उर्वरित १७ हजार १२ अनमॅप्ड मतदार तसेच २३ हजार १७६ अनॉमली मतदारांच्या नोंदींची तपासणी सुरू असून हे काम गतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सेलू तालुक्यात विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम २०२६ वेगाने राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या अध्यक्षतेखाली सेलू येथे सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, बीएलओ, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांची आढावा बैठक पार पडली. यावेळी मतदार याद्या अचूक व त्रुटीमुक्त करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

मतदार पुनरीक्षण कार्यक्रमानुसार २९ जुलै २०२६ पर्यंत बीएलओमार्फत गणना फॉर्म भरून घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार असून ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. त्यानंतर पडताळणी व सुनावणी प्रक्रिया पूर्ण करून ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

बैठकीत मार्गदर्शन करताना शैलेश लाहोटी यांनी स्पष्ट केले की, ज्या मतदारांचे छायाचित्र स्पष्ट आहे त्यांचे नवीन छायाचित्र घेण्याची आवश्यकता नाही. केवळ अस्पष्ट किंवा अंधुक छायाचित्रे असलेल्या मतदारांचे फोटो अद्ययावत करावेत. तसेच अनमॅप्ड अथवा नाव, जन्मतारीख, वय आदी बाबींमध्ये त्रुटी असलेल्या मतदारांच्या नोंदींची काळजीपूर्वक तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे त्यांचा समावेश अंतिम यादीत करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीस तहसीलदार डॉ. शिवाजी मगर, सेलू नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश गायकवाड, नगराध्यक्ष मिलिंद सावंत, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, बीएलओ, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी व पत्रकार उपस्थित होते. मतदार नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता आणि अचूकता राखण्यासाठी सर्व राजकीय पक्षांच्या बूथस्तरीय प्रतिनिधींनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

### चांदजजवळ अपघातात मुख्याध्यापक गंभीर जखमी

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर-परभणी मार्गावरील चांदज गावाजवळ अॅपे वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार मुख्याध्यापक गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवार ९ जूलै रोजी घडली. या प्रकरणी अॅपे चालकाविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालविल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उत्तम बाबुराव राठोड (वय ४९, रा. दत्तवाडा, ता. गंगाखेड) हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नीलज येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा मुलगा अनिल याला विजेचा धक्का लागल्याने त्याच्यावर परभणी येथील रुग्णालयात उपचार सुरू होते.

# नांदिग्राम एक्स्प्रेसच्या फर्स्ट एसी डब्यात अनधिकृत प्रवेश

**परभणी ,/प्रतिनिधी-:** बल्लारशाह-मुंबई नांदिग्राम एक्स्प्रेसच्या प्रथम वातानुकूलित (फर्स्ट एसी) डब्यात जालना येथील एका खासगी डेकोरेटरने अनधिकृतपणे प्रवेश करून सजावट केल्याच्या प्रकरणाची दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने गंभीर दखल घेतली असून संबंधित तिकीट तपासणी कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात आले आहे. तसेच डेकोरेटरविरुद्ध रेल्वे कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार ६ जुलै २०२६ रोजी जालना स्थानकावरून संबंधित डेकोरेटरने नांदिग्राम एक्स्प्रेसमध्ये प्रवेश केला आणि कोणतीही अधिकृत परवानगी न घेता प्रथम वातानुकूलित कूपेमध्ये सजावट केली. आरक्षित आणि उच्च सुरक्षा असलेल्या या डब्यात झालेला अनधिकृत प्रवेश रेल्वे प्रशासनाने अत्यंत गंभीर स्वरूपाचा मानला आहे. या घटनेची माहिती मिळताच रेल्वे प्रशासनाने तातडीने चौकशी सुरू केली. प्राथमिक तपासात संबंधित तिकीट तपासणी कर्मचाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे हा प्रकार घडल्याचे आढळून आल्याने त्याला पुढील चौकशी पूर्ण होईपर्यंत निलंबित करण्यात आले आहे. तसेच घटनेतील जबाबदारी निश्चित




करण्यासाठी आणि सुरक्षाविषयक प्रक्रियेमधील त्रुटींचा शोध घेण्यासाठी विभागीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. चौकशी अहवालानंतर दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. दरम्यान, संबंधित डेकोरेटरविरुद्ध रेल्वे गाडीत अनधिकृत प्रवेश करणे, वैध तिकीटाशिवाय प्रवास करणे आणि रेल्वे परिसरात अनधिकृत प्रवेश केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, कोणत्याही खासगी व्यक्तीला अथवा व्यावसायिक सेवा पुरवठादाराला आवश्यक परवानगीशिवाय रेल्वे गाडीत किंवा आरक्षित डब्यांमध्ये प्रवेश करण्याचीं मुभा नाही. प्रवाशांनीही सजावट किंवा इतर सेवांसाठी अशा अनधिकृत व्यक्तींना नियुक्त करू नये. रेल्वे नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. प्रवाशांची सुरक्षितता, सुरक्षा आणि प्रवासातील सुविधा अबाधित राखण्यासाठी रेल्वे प्रशासन कटिबद्ध असून रेल्वेच्या नियमांची आणि कार्यपद्धतीची कठोर अंमलबजावणी सातत्याने केली जाईल, असे दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# भेसळीचा बोकाळलेला भस्मासुर

हृदय जिंकण्याचा मार्ग पोटातून जातो, असे म्हणतात. पण गेल्या काही दशकांत हा विचार मागे पडत चालला आहे. कॉर्पोरेट जगाने किंवा धंदेवाईकांच्या जाहिरातबाजीने जेव्हापासून ग्राहक नावाच्या वस्तूच्या मनावर कब्जा मिळविला, तेव्हा हा विचार मागे पडला आणि हृदये जिंकण्याचा मार्ग निव्वळ जाहिरातबाजीतून जातो हे सिद्ध होऊ लागले. जाहिरात हे ग्राहकास आकर्षित करण्याचे आणि संपूर्ण जीवनशैली बदलण्याची क्षमता असलेले प्रभावी माध्यम असल्याचे सिद्ध होऊ लागले, तेव्हापासून ग्राहकाने मन, हृदय आणि शरीर, त्वचा, कान, नाक, डोळे आणि सारे अवयव अंधपणाने जाहिरातविश्वाच्या स्वाधीन करून टाकले आणि जाहिरात सांगेल तेच खरे आणि जाहिरात सांगेल तेच करावयाचे असा प्रघात पडला. आता अशा तऱ्हेने प्राधान्य झालेल्या आणि धंदेवाईक जगाकडून जिंकल्या गेलेल्या हृदयांच्या व्यथा बोलक्या होऊ लागल्या आहेत. या जगाने आपल्या जाहिरातकलेतून हृदये जिंकली, पण त्यांची शक्ती मात्र हिरावून घेतली. एकदा हृदयावर ताबा मिळविला, की मनाला हवे तसे वळविण्याची ताकदही मिळविता येते हे माहीत असलेल्या धंदेवाईकांच्या जगाने त्याचा फायदा घेत ग्राहक नावाच्या वस्तूला अक्षरशः वापरण्यास सुरुवात केली आणि ग्राहकांनीही त्यास मुक्त मुभा दिली, असे आता उघडकीस येऊ लागले आहे. आपल्या दैनंदिन जीवनात ज्या काही वस्तू वापरल्या जातात, त्याचा हृदयावर, शरीरावर किंवा शरीराच्या कोणत्याही अवयवावर तसेच मनावरही, कोणता परिणाम होतो याची जाणीवच हिरावून घेतली गेली आहे, असे या नव्या कारवायांतून स्पष्ट होऊ लागले आहे. जाहिरात हे ग्राहकांस आकर्षित करण्याचे साधन आहे असे मानले जाते. आता तो समजही दूर होऊ लागला असून, जाहिरात हे ग्राहकास आकर्षित करण्याचे नव्हे, तर फसविण्याचे साधन आहे, असे वाटण्याजोगी परिस्थिती दिसू लागली आहे. महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा कार्यभार तुकाराम मुंढे नावाच्या एका सनदी अधिकाऱ्याने हाती घेतला आणि प्रशासन नावाची ही व्यवस्था सक्रिय झाली. याआधीही ही यंत्रणा अस्तित्वात होती. लहानमोठ्या कारवायादेखील या यंत्रणेकडून केल्या जात होत्या. पण त्यासाठी काही निमित्त असे. म्हणजे, सणासुदीच्या दिवसांत ज्या खाद्यपदार्थांचा वापर ग्राहकांकडून सणाचा आनंद द्विगुणित करण्याकरिता केला जातो, अशा पदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्या धंद्यांवर धाडी टाकून काही मुद्देमाल जप्त केला जात असे. खवा, मावा, दूध, बनावट आणि खाण्यास योग्य नसलेल्या रंगांचा वापर करून आकर्षक बनविलेल्या मिठाया, आदी पदार्थ जप्त करून कारवाईचा मोठा गाजावाजाही केला जात असे. सणासुदीचा हंगाम संपला, की पुन्हा या पदार्थांचा बाजार आपल्या जुन्या पायवाटेवरून पुढे चालत असे आणि पुन्हा जोरदार जाहिरातींच्या प्रभावामुळे ग्राहकासही अशा कारवायांचा विसर पडत असे. गेल्या अनेक दशकांत असे भेसळयुक्त, घातक रसायनांचा वापर केलेले आणि खाण्यास व आरोग्यास अपायकारक असलेले असंख्य पदार्थ बाजारपेठांनी केवळ जाहिरातबाजीच्या जोरावर ग्राहकांच्या माथी मारले असून त्यांच्या प्रचंड विक्रीतून अनेक उद्योगांनी आपली भरभराटही साधली आहे, हे आता उघड होऊ लागले आहे. म्हणूनच, तुकाराम मुंढे नावाच्या या सनदी अधिकाऱ्याने सुरू केलेल्या 'महाराष्ट्र वाचवा' मोहिमेतून ग्राहकांच्या म्हणजे माणसाच्या आरोग्यास उपकारक असे काही कायमस्वरूपी निष्पन्न व्हावे अशी सामान्य माणसांची अपेक्षा आहे.

जेमतेम काही महिन्यांपूर्वी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा कार्यभार हाती घेतला आणि अशा धंद्यांवरील धाडींचे सत्र सुरू झाले. आपण वापरतो ती सौंदर्य प्रसाधने, वेगवेगळ्या आजारांपासून मुक्तता मिळविण्यासाठी किंवा जीवघेण्या आजारांच्या धोक्यापासून बचाव करण्यासाठी वापरली जाणारी औषधे, विरंगुळा म्हणून किंवा चवबदल म्हणून खाल्ले जाणारे फास्ट फूड, सणासुदीच्या काळाचा आनंद द्विगुणित करणाऱ्या स्वादिष्ट मिठाया आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, जन्माला आल्यानंतर पहिल्यांदाच ज्याची चव बाळाला चाखविली जाते, ते आरोग्यास पोषक म्हणून पूर्णान्न मानले जाणारे दूधदेखील भेसळयुक्त अथवा कृत्रिम आहे आणि अलिकडे बळावलेले अनेक आजार अशाच काही भेसळयुक्त पदार्थांमुळे होत आहेत, याची जाणीव आता जागी होऊ लागली आहे. नागपूरमधील एका प्रसिद्ध औषध कंपनीच्या नावाने कायमोरल फोर्ट नावाच्या बनावट गोळ्या बाजारात विकल्या गेल्या आणि त्या पुरवठा साखळीचा शोध सुरू झाल्यावर याचे धागेदोरे थेट मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशातील विक्रेते आणि पुरवठादारांपर्यंत पोहोचले. सौंदर्य खुलविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या काही बनावट फेअरनेस क्रीम्समध्ये त्वचा आणि किडनीला हानी पोहोचविणारे घटक असल्याची बाबही प्रशासनाने आता उजेडात आणली आहे. पाकिस्तानात उत्पादन होणाऱ्या काही घातक सौंदर्य प्रसाधनांनी भारतातील बाजारपेठांत शिरकाव केल्याचेही स्पष्ट झाले.

आजकाल आपल्या गरजेच्या असंख्य वस्तू घरबसल्या मिळण्याची सोय अनेक शहरांत आणि आसपासच्या गावांतही उपलब्ध झाल्याने, मोबाईलवरील ॲपद्वारे ऑर्डर करण्याची सवय वाढत चालली आहे. गेल्या महिन्यांत अखेरच्या आठवड्यातील एके दिवशी मुंढे यांच्या आदेशावरून अन्न आणि औषध प्रशासनाच्या पथकाने ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात सरवली येथे एक कारवाई केली आणि ऑर्डर देऊन मागविलेले खाद्यपदार्थ किती धोकादायक ठरू शकतात, याचे विदारक वास्तवच स्पष्ट झाले. अमेझॉन रिटेल इंडिया नावाच्या प्रसिद्ध कंपनीच्या गोदामात या वास्तवाची पाळेमुळे रुजली होती, हे उघड झाले. ग्राहकांच्या आरोग्यास घातक ठरू शकतील असे, कालबाह्य झालेले खाद्यपदार्थ नष्ट न करता त्यांची पुन्हा विक्री करण्यात येत असल्याची माहिती मिळाली आणि पथकाने या गोदामावर कारवाई सुरू केली. या धंद्यात कंपनीने आणखीही एका धंदेवाईकास हाताशी धरले होते, हेही स्पष्ट झाले. कालबाह्य आणि आरोग्यास अपायकारक अशा अन्नपदार्थांची विल्हेवाट लावल्याची प्रमाणपत्रेदेखील खोटी असल्याचे स्पष्ट झाले. अशी खोटी प्रमाणपत्रे सादर करून प्रत्यक्षात त्या पदार्थांची विल्हेवाट न लावता त्यांची पुन्हा विक्री करणाऱ्या घरपोच सेवेचा लाभ आजवर लाखो ग्राहकांनी घेतला असेल आणि पोटातून जाणाऱ्या या पदार्थांनी कदाचित त्यांची हृदयेदेखील जिंकली असतील. आता त्यामागील सत्य स्पष्ट झाले असून, मुदतबाह्य पदार्थ ग्राहकांच्या माथी मारूनच त्याची विल्हेवाट लावली जात असल्याचेही उघड झाले आहे. नागपूरच्या एका नामांकित इस्पितळात कायदेशीर परवानगी नसलेली लाखो रुपयांची औषधे विक्रीसाठी राखून ठेवली होती आणि रुग्णांना बाहेरून औषधे आणण्याचे स्वातंत्र्य नाकारून, या यंत्रणेतून औषधे खरेदी करण्याची सक्ती केली जात होती. ग्राहकाच्या व्यवहारांवर ताबा मिळविण्याचे या धंद्याचे तंत्रदेखील या कारवाईतून उघड झाले. अगदी अलिकडे, आपल्या वैशिष्ट्यपूर्ण चवीमुळे



ग्राहकांची हृदये जिंकणाऱ्या मुंबईतील एक नामांकित आईस्क्रीम निर्मात्या कंपनीवरील कारवाईतून उघडकीस आलेले चित्र धक्कादायक आहे. या कंपनीच्या आईस्क्रीम पार्लरमध्ये जिवंत उंदरांचा सुळसुळाट, माश्यांचा स्वैर संचार, कोल्डचेनमध्ये बिघाड आणि मुदतबाह्य उत्पादने आढळून आली. नागपूरमध्ये एका मिठाई नव अन्नपदार्थ उत्पादकाच्या तपासणीत मेलेला उंदीर आढळला. या मृत उंदराच्या बाजूलाच अन्नपदार्थांचे उत्पादन सुरू असल्याचे दिसून आले. ग्राहकांच्या आरोग्याशी असा खेळ करणाऱ्या धंद्यांवरील कारवायांमुळे आता महाराष्ट्र बचाव मोहिमेविषयी लोकांच्या अपेक्षांना आश्वस्ततेची जोड मिळू लागली आहे. अन्नपदार्थांत घातक पदार्थांची भेसळ होते, बनावट औषधे, सौंदर्य प्रसाधने आरोग्यास अपायकारक असतात, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ कृत्रिमरीत्यादेखील तयार करता येतात, हे ग्राहकांच्या कानावर पडत होते. पण अशा धंद्यांवरील कारवायांचा वेग मात्र अनाकलनीयरीत्या कमी होता. आता जेमतेम चार-दोन महिन्यांतील कारवायांनी अशा काळ्या धंद्याचे कंबरडे मोडण्यास सुरुवात केल्याने, अन्न व औषध प्रशासनाच्या कारभाराचा जुना इतिहास विसरणेच योग्य ठरेल.

गेल्या आठ-दहा दिवसांत प्रशासनाच्या पथकांनी आपला मोर्चा दुधाकडे वळविला आहे. दूध न वापरणारे घर महाराष्ट्रात अपवादानेच आढळेल. देशात धवल क्रांतीचे पर्व सुरू झाले आणि दुधाचा महापूर आला. या महापुराचा तडाखा एवढा मोठा होता, की मागणीलाही प्रचंड पूर आला. दुधाचे उत्पादनही कमी ठरावे एवढ्या मोठ्या प्रमाणात मागणी सुरू झाली, तरीही दुधाचा तुटवडा मात्र कधीच जाणवला नाही. उलट, मागणी पूर्ण करून दुधाची भुकटी तयार करण्याचा उद्योगही या क्षेत्राला सापडला आणि दुधाच्या धंद्यातील अनेकांचे उखळ पांढरे झाले. दुधाचे प्रत्यक्ष उत्पादन, मागणी आणि दूध व दुग्धजन्य पदार्थांची बाजारपेठ यांचे गणित कसे जुळते याचा हिशेब मात्र फारसा झालाच नसावा. अन्यथा, ग्राहकांच्या मागणीला पुरून उरणारे दूध येते तरी कोठून हा प्रश्न सतत समाजाला छळत राहिला असता. आता प्रशासनाच्या कारवायांममुळे या प्रश्नांची अनेक उत्तरे समोर येऊ लागली असून, उत्पादन, मागणी आणि पुरवठा यांतील तफावत भरून काढणारा कृत्रिम दुधाचा धंदा तेजीत असल्याचे उघड गुपित आता पुराव्यानिशी स्पष्ट झाले आहे. राज्याच्या सात जिल्ह्यांत एकाच वेळी अत्यंत नियोजनबद्ध रीतीने छापे टाकून ग्राहकांचा आरोग्याशी खेळणाऱ्या या भेसळीच्या भस्मासुराच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात झाली आहे. पुणे, अहिल्यानगर, सोलापूर, जालना, ठाणे व अन्य दोन जिल्ह्यांतील कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेला जवळपास तीन कोटींचा मुद्देमाल आणि हस्तगत करण्यात आलेले संशयास्पद नमुने तपासल्यानंतर, भेसळीचा काळा धंदा केवळ पाणी मिसळण्यापुरता मर्यादित नसून रसायने, डिटर्जंट, चरबी, युरिया, दूध भुकटी, शाम्पू, पामतेल, इमल्सिफायर आदी अनेक घातक वस्तूंपासून दूध तयार करून बनावटरीत्या बाजारात पुरविले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. या घातक पेय नैसर्गिक दुधात मिसळून किंवा या वस्तूंपासून दूध तयार करून ते पुरवठा साखळीत बेमालूमपणे आणणारे काळे धंदे महाराष्ट्रात वर्षानुवर्षे सुखाने सुरू आहेत आणि संबंधित यंत्रणेस त्याची पुरेपूर जाणीवही आहे. भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या साईबाबांच्या शिर्डीत, अनेक श्रद्धाळू बाबांचा प्रसाद म्हणून तेथील पेढे विकत घेतात. गेल्या महिन्यात या पेढ्यांच्या बाजारपेठेतील भेसळीचा भस्मासुर प्रशासनाने पकडला. सुमारे सातशे किलो भेसळयुक्त पेढे बुलडोझरच्या साह्याने नष्ट करण्यात आले. ग्राहकांच्या जिवाशी असा भयानक खेळ खेळणाऱ्या या काळ्या धंद्याला कोण संरक्षण देतो, कोणाचे पाठबळ आहे, याची उत्तरे सापडणे मात्र, अवघडच आहे. अन्न व औषध प्रशासन आता गतिमान होत असून प्रशासनाकडे दाखल होत असलेल्या प्रत्येक तक्रारीवर योग्य ती कारवाई होत आहे, अशी माहिती दोन दिवसांपूर्वी राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी विधानसभेत दिली. आता गतिमान होत असलेले प्रशासन याआधी सुस्त होते, याचीच ही अप्रत्यक्ष कबुली नव्हे का?

अन्न हे पूर्णब्रह्म आहे अशी आपल्या संस्कृतीची शिकवण आहे. अन्नाचे सेवन करणे हे केवळ पोट भरणे नव्हे, तर यज्ञकर्म आहे, असेही म्हटले जाते. बाळाच्या बाटलीतून पाजले जाणारे व पूर्णान्न मानले जाणारे दूध, खाल्ला जाणारा अन्नाचा प्रत्येक घास आणि जीव वाचविणारी किंवा आरोग्यास पोषक ठरणारी औषधे विश्वासार्ह असलीच पाहिजेत. कारण, सुरक्षित आणि आश्वस्त जगणे हा जनतेचा पहिला हक्क असतो. त्या हक्काची जपणूक करणे ही अशा यंत्रणांची जबाबदारीच असते. त्यामुळेच, अन्न व औषध प्रशासनाने उघडलेल्या महाराष्ट्र बचाव मोहिमेचे कौतुक होणे साहजिक असले, तरी ती या यंत्रणेची जबाबदारीच आहे, हेही स्पष्ट आहे. उलट, ही जबाबदारी या यंत्रणेने याआधी एवढ्या धडाकेबाजपणे का पार पाडली नाही, हा प्रश्न आता विचारला गेला पाहिजे. तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या कारवाया केवळ प्रशासनाच्या जबाबदारीचा भाग नव्हे, तर जनतेच्या आरोग्यासमोर संकटे निपटण्याची मोहीम आहे. अशा मोहिमा म्हणजे जनतेच्या आरोग्याचा आधार असतात, मुलांच्या भविष्याची हमी असतात आणि समाजाच्या निकोप प्रगतीच्या पायऱ्या असतात. शुद्ध अन्न, गुणवत्तापूर्ण औषधे हा केवळ आरोग्याशी निगडित मुद्दा नाही, तर व्यवसायाच्या सचोटीचा, म्हणजेच समाजाच्या संस्कृतीचाही आरसा असतो. भेसळखोरीमुळे समाजाला आरोग्यसंकटाच्या खाईत ढकलणाऱ्या प्रवृत्ती सहजपणे जेथे फोफावतात आणि त्यांचे धंदे सुखैनेव सुरू राहतात, अशा समाजाच्या संरक्षणासाठी संस्कृती असमर्थ ठरते. केवळ परंपरा, संस्कृती आणि संस्काराचे पाढे वाचून हा बदल घडणार नाही. मानसिकतेशी संबंधित असलेल्या या विकृती ठेचून टाकण्यासाठी कृतिशील होण्याची गरज आहे. अन्न व औषध प्रशासन गतिमान झाल्याने त्या अपेक्षा आता वाढल्या आहेत. कोणत्याही दबावाचे किंवा सुस्तीचे निमित्त त्यामध्ये बाधा आणणार नाही, याची दक्षता घ्यायला हवी. ■

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### टी. बी. गोल्हरांचा प्रश्न म्हणजे...

पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्याची कला नाही; ती समाजाला प्रश्न विचारण्याची, सत्तेला जबाबदार धरण्याची आणि सत्याला शब्द देण्याची एक अखंड साधना आहे. या साधनेचे आयुष्यभर व्रत जपणारे ज्येष्ठ पत्रकार तुळशीदास भगवंतराव (टी. बी.) गोल्हर यांचे २ जुलैला निधन झाले. यवतमाळ जिल्ह्यातील धनज-माणिकवाडा या छोट्याशा गावातून सुरू झालेला त्यांचा प्रवास नागपूरमार्गे देशाची राजधानी दिल्लीपर्यंत पोहोचला. नागपूर विद्यापीठाच्या जनसंवाद विभागातील सुवर्णपदक, विधि विषयातील पदव्युत्तर शिक्षण, नागपूर टाईम्समधील प्रारंभ, नवी दिल्लीमध्ये सर्वोच्च न्यायालयात यूएनआयचे विधि वार्ताहर म्हणून काम आणि त्यानंतर नागपूर येथे यूएनआयचे दीर्घकाळ ब्युरो प्रमुख म्हणून केलेली कारकीर्द या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी पत्रकारितेची उंची वाढवली. देशातील दिग्गज नेत्यांच्या पत्रकार परिषदांपूर्वी अनेकदा विचारणा व्हायची- ''गोल्हर सर आले आहेत का?'' आणि परिषद संपल्यानंतर दुसरा प्रश्न असायचा- ''आज त्यांनी काय विचारले?'' त्यांचा एक नेमका प्रश्न दुसऱ्या दिवशी राष्ट्रीय वृत्तपत्रांच्या मथळ्यात झळकण्याची ताकद बाळगत असे. म्हणूनच पत्रकारितेच्या वर्तुळात एक वाक्य प्रसिद्ध झाले होते- ''गोल्हरांचा प्रश्न म्हणजे... राष्ट्रीय स्तरावरची हेडलाईनच!'' गोल्हर सरांना आदरांजली.

**प्रवीण टाके**/उपसंचालक,
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर. ९७०२८५८७७७

■■■

### समतोल विकास आवश्यक

विकास समतोल असला पाहिजे, याबाबत कुणाचे दुमत असू शकत नाही. विकास म्हणजे पर्यावरणाचा समतोल राखत नागरिकांना मूलभूत सोईसुविधा पुरविणे. नागपूर शहराचा विकास झाला खरा; पण अजूनही अनेक भागांत काही मूलभूत समस्या कायम आहेत. काचीपुरा ते बजाजनगर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना महानगर पालिकेतर्फे सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. येथे झोपाळ्यांपासून तरुणाईला बसण्यासाठी चांगली सोय करून देण्यात आली आहे. पण हे केवळ सौंदर्यीकरण ठरले आहे. येथे रात्री उशिरापर्यंत युवकांच्या मैफली सजतात. सौंदर्यीकरण, सिमेंट रस्ते, बागबगिचांचे सौंदर्यीकरण म्हणजे विकास म्हणता येईल का? आज अनेक वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा नाहीत. अनेक ठिकाणी उन्हाळ्यात टँकरने पाणीपुरवठा होतो. पथदिवे, कचऱ्याची समस्या आहे.

पाणी हे जीवनच. नुसतेच पाणी नाही तर ते शुद्ध मिळणे, हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. नागपुरात २४ बाय ७ पाणीपुरवठा केला जातो, हे मोठ्या दिमाखाने सांगितले जाते. वस्तुस्थिती वेगळी आहे. नव्याने अस्तित्वात येत असलेल्या वस्त्यांसमोर मोठ्या समस्या आहेत. यातील काही वस्त्या नागपूर मेट्रो रिजनच्या हद्दीत, महानगरपालिका क्षेत्राच्या बाहेर, म्हणजे ग्रामपंचायत क्षेत्रात येतात. या वस्त्यांना मूलभूत सोईसुविधा पुरविण्याची नेमकी जबाबदारी कुणाची याबाबत अजूनही अनिश्चितता आहे. महानगरपालिका क्षेत्राबाहेर येत असल्यामुळे महानगरपालिका जबाबदारीतून सुटली. आता उरला प्रश्न एनएमआरडीए आणि ग्रामपंचायतींचा. या वस्त्यांमधील नागरिक ग्रामपंचायतींमध्ये कर भरतात म्हणजे मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवर निश्चित व्हायला हवी. पण ग्रामपंचायती म्हणतात, आम्ही फक्त साफसफई आणि पथदिव्यांची सोय करून देऊ. पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी आमची नाही. जिल्हा परिषद म्हणते, मेट्रो रिजनसाठी विकास शुल्क एनएमआरडीए घेते, तर पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी एनएमआरडीएची आहे. एनएमआरडीएकडून उत्तर मिळते- निधी नाही. अशा वेळी नागरिकांनी शुद्ध पाण्यासाठी कुणाकडे जावे? हिंगणा तालुक्यातील कोतेवाडा ग्रामपंचायती अंतर्गत वस्त्यांमधील नागरिक अशा जबाबदारी ढकलण्यामुळे त्रस्त झाले आहेत. डेव्हलपर म्हणतो, मी ग्रामपंचायतीला लेआऊट हस्तांतरित केले आहे. एनएमआरडीएचे आणखी एक उत्तर- संबंधित भागात अजून पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकण्यात आलेली नाही. काम सुरू आहे, कामाला दीड-दोन वर्षे लागतील. मग तोपर्यंत त्या भागातील नागरिकांनी पाणी ही मूलभूत गरज कशी भागवायची? लेआऊटला परवानगी मागितली, देऊन द्या. नकाशा मंजुरीसाठी आला मंजूर करा. पण पुढचा विचार कोण करणार? आज अनेक वस्त्यांना केवळ मंजुरीच मिळाली आहे. सोईसुविधा नाहीत. नागपूर शहर चारही बाजूंनी विस्तारत आहे. शहराचा विकास झपाट्याने होत आहे. परिवर्तन निसर्गाचा नियम आहे; नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवूनच हे परिवर्तन झाले पाहिजे.

**आनंद विनायक मोहरील**/७२१८२०२५०२

■■■

### ''व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्।''

ही लोकोक्ती सगळे ऐकतात. पण काहीच त्याचा अर्थ जाणतात. या उक्तीचा अर्थ असा की, या जगात असा कोणताही विषय नाही, ज्याचे निरूपण महर्षी व्यासांनी केलेले नाही. येथे ''उच्छिष्ट'' या शब्दाचा अर्थ ''उरलेले'' असा नसून, ''ज्याचा विचार केला आहे, ज्याला आपल्या ज्ञानाने स्पर्श केला आहे'' असा आहे. ही उक्ती व्यासांच्या सर्वस्पर्शी प्रतिभेची आणि भारतीय ज्ञानपरंपरेवरील त्यांच्या अमिट ठशाची साक्ष देते. महर्षी वेदव्यासांविषयी व्यक्त झालेला हा सर्वोच्च गौरव आहे.

**एवढे व्यासांनी काय रचले?** : भारतीय वाङ्मयपरंपरेत महर्षी व्यास हे केवळ एक ऋषी नाहीत, तर ते विपुल साहित्याचे शिल्पकार आहेत. भारतीय ज्ञानपरंपरा, संस्कृती आणि साहित्याचा इतिहास महर्षी व्यास यांच्या नावाशिवाय अपूर्ण आहे.

शंकराचार्यांचे प्रसिद्ध वचन आहे -
नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविन्दायतपत्रनेत्र।
येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः॥

या श्लोकात व्यासांच्या ज्ञानाची तुलना अशा दीपाशी केली आहे, ज्याने महाभारत या तेलाने संपूर्ण मानवजातीच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पसरविला.

**वेदांचे सम्पादन** : व्यासांनी वेदांचे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद असे चार विभाग केले. प्रत्येक वेदांच्या अनेक शाखा आहेत. पातञ्जली ऋषींनी लिहिलेल्या 'महाभाष्य' ग्रंथानुसार वेदांच्या ११३१ शाखा होत्या. प्रत्येक शाखेचे चार भाग आहेत - संहिता, ब्राह्मण, आरण्यक व उपनिषद्. हे कार्य केवळ संपादन नव्हते, तर भारतीय ज्ञानपरंपरेचे जतन करणारे युगप्रवर्तक कार्य होते. म्हणूनच आषाढ पौर्णिमा हा दिवस व्यासपौर्णिमा किंवा गुरुपौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. भारतीय गुरू-शिष्य परंपरेचे ते आद्यगुरू मानले जातात.

महाभारताचे रचनाकार : महर्षी व्यासांचे सर्वांत महान कार्य म्हणजे महाभारत.

**श्रीश देवपुजारी**

■■■

### श्वास एक वारी

''आम्ही देखिला विठोबा । आनंदे विटेवरी उभा''. पंढरपूरची आषाढी वारी म्हणजे समतेचा मेळा आणि मानवतेचा सोहळा होय. ही वारी जशी जनात चालते तशी मनातही चालायला हवी. वारी म्हणजे सतत जाणे येणे. माणसाच्या शरीरात श्वासाचे अव्याहत येणे जाणे हीच खरी वारी! स्वस्थ माणूस साधारणतः २४ तासात २१६०० वेळा श्वास-प्रश्वास करतो. तेव्हा श्वासाच्या प्रक्रियेवर लक्ष केंद्रित केल्यास 'सोहं' शब्द ऐकू येतो. श्वास आत घेताना 'सो' (म्हणजे 'तो' परमात्मा) असा ध्वनी होतो आणि श्वास सोडताना 'हं' (म्हणजे 'मी') असा ध्वनी होतो. हा अखंड चालणारा 'सोऽहं' जप म्हणजेच अंतरीची वारी. थोडक्यात, वेगळी माळ न ओढता किंवा नामोच्चार न करता, फक्त श्वासांच्या लयबद्धतेवर लक्ष केंद्रित करून देवाशी जोडले जाणे, म्हणजे समर्थांची अजपा वारी होय.

बाकी सगळा बाह्य पसारा. लौकिक जीवनात अनेक शास्त्रे, अनेक पंथ, अनेक धर्म, अनंतकथा, अनंत व्यथा, अनंत पुस्तके, अनंत यात्रा, इत्यादींचा परामर्श व्यक्ती घेतो. पण समर्थ म्हणतात ''बहुत शास्त्रें धुंडाळिता आयुष्य पुरेना सर्वथा, अंतरी संशयाची व्यथा वाढोची लागे'' तरीसुद्धा आपण या पसाऱ्यात गुंतून पडतो व आनंद शोधण्याचा प्रयत्न करतो तो आपला प्रयत्न दुबळा असतो. कारण हे जग अहेतुकपणे निर्माण झाले आहे. समुद्रात उठणाऱ्या लाटांचा स्वतःचा असा कोणताही हेतू नसतो. त्या वाऱ्यामुळे आपोआप निर्माण होतात. त्याचप्रमाणे हे अफाट विश्व व त्यातील जीवन निसर्गाच्या नियमांचे परिणाम आहे. उद्याचा दिवस हा निसर्गाच्या मर्जीवर अवलंबून असतो. आपण फासा फेकतो तेव्हा अमुक एक अंक येईल असे आधीपासून निश्चित नसते. आपल्याला मात्र दोन, चार, सहा, आठ दान हवे असते. आपल्या मनासारखा अंक आला तर तो फक्त योगायोग. त्याचप्रमाणे निसर्गक्रमात उद्या काय होईल हे निश्चितपणे सांगता येत नाही. चौसरच्या खेळात घरात जाणारी गोटी अकस्मात उंबरठ्यावर मरते आणि इच्छा नसूनही दूध उतू जातेच! हिंदी सिनेमातील एक गाणं आहे,

''मैं ज़िन्दगी का साथ निभाता चला गया,
हर फ़िक्र को धुएँ में उड़ाता चला गया,
बरबादियों का शोक मनाना फ़जूल था!''


बरबादियों का जश्न मनाता चला गया अर्थात जे उतूं गेलं त्याचाही आनंदाने स्वीकार करावा ही वारीची खरी शिकवण. आणि जीवनाबद्दल खरी हीच वास्तविकता आहे. माणसाला कदाचित उद्याचा अंदाज बांधता येऊ शकत असेल, त्यामुळे आशा असते ही आशा जीवनाचा आधार असते त्यामुळे म्हणतात ''आस पर आसमान टंगा''. आशा ही जेव्हा दुराशा होते, तेव्हा जावेच लागते. हे जाण्या येण्याचे रहाटगाडगे म्हणजे वारीच! ''पुनरपी जननं पुनरपी मरणं'' वारीतून जो मुक्ती देतो तो कैवारी म्हणजे पांडुरंग!

**अभय गोरे**/९८९३७१९२७८

■■■

### सांग सांग भोलानाथ...

हवामान खात्याने मुसळधार पावसाचा दिल्यामुळे उद्या शाळेला सुट्टी राहील, ही सूचना ऐकताच वर्गात मुले मोठ्याने ओरडून आनंद व्यक्त करतात. हा अनुभव मी शिक्षक म्हणून काम करताना अनेकदा घेतला आहे. खरं तर अचानक आणि अनपेक्षित मिळालेली सुट्टी ही बालकांना सर्वात प्रिय गोष्ट म्हणावी लागेल. पूर्वी समाजमाध्यमे जवळपास नव्हतीच;



संपर्क माध्यमेही कमी होती. त्या काळातदेखील सुट्टीची बातमी वाऱ्यासारखी पसरत असे. कधी कधी रात्री खूप उशिरा दुसऱ्या दिवशीची सुट्टी जाहीर होत असे. त्यावेळी मात्र बातमी सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नसे. अशा वेळी ही बातमी न पोहोचलेले विद्यार्थी शाळेत येत असत. विद्यार्थ्यांना सुट्टी दिली असली, तरी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुट्टी नव्हती आणि आत्ताही नसते. चुकून शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांना सुट्टी आहे हे जेव्हा शिक्षक सांगत तेव्हा त्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद अवर्णनीय असे. उड्या मारतच तो भर पावसात घराकडे परतत. खरं म्हणजे अनपेक्षित मिळालेली सुट्टी म्हणजे नियमित सुट्टीपेक्षा अधिक अनमोल असते. आपल्या जीवनातही अनपेक्षित घडलेली घटना, मिळालेली भेट, झालेला लाभ हा आपणासाठी मोठा आनंददायी असतो. मात्र या पावसाच्या अनपेक्षित सुट्टीचा मोठा मनस्ताप खेड्यापाड्यावर आडवळणी राहणाऱ्या विद्यार्थ्यांना होत असतो. शाळेत येऊन शाळा नाही असे समजल्यावर तो विद्यार्थी पुन्हा चार-पाच किमी परतताना दुःखी होऊनच परतत असे. आजकाल शाळेत पायी जाणारी मुलेमुली दिसत नाहीत. पूर्वीच्या काळी सर्वच विद्यार्थी पायी जात. त्यांना मिळालेली सुट्टी म्हणूनच त्यांना अनपेक्षित भेट वाटत असे. 'सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल काय, शाळेभोवती तळे साचून सुट्टी मिळेल काय?' हे बालगीत म्हणूनच सर्व बालकांचे प्रिय गाणे असावे.

**सुदाम कृष्णाजी विश्वे**/पुणे. ९८६०५८६१४७

### मन हरवते तेव्हा व्यसन सापडते

आज प्रत्येक पालक आपल्या मुलांनी चांगले शिकावे, मोठे व्हावे, आयुष्यात यशस्वी व्हावे यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहे. मात्र या धावपळीत एक प्रश्न नकळत मागे पडत आहे- आपल्या मुलांचे मन खरोखर आनंदी आहे का? आजचा तरुण बुद्धिमान आहे, स्वप्नाळू आहे आणि मोठी झेप घेण्याची क्षमता त्याच्यात आहे; त्याच वेळी तो स्पर्धा, अपेक्षा, अपयशाची भीती, करीअरची अनिश्चितता, बेरोजगारी, नातेसंबंधांतील तणाव आणि सोशल मीडियावरील आभासी जगाच्या दडपणाखाली जगत आहे. मानसिक आरोग्य म्हणजे केवळ मानसिक आजार नसणे नव्हे. संकटांना धैर्याने सामोरे जाणे, स्वतःच्या भावनांना समजून घेणे, अपयश पचवून पुन्हा उभे राहणे, नातेसंबंध जपणे आणि जीवनाबद्दल आशावादी दृष्टी ठेवणे म्हणजे मानसिकदृष्ट्या निरोगी असणे. शरीराला जशी जखम होते, तशीच जखम मनालाही होते; फरक एवढाच की मनावरील जखमा अनेकदा दिसत नाहीत. अशा वेळी काही तरुण चुकीचा आधार शोधतात आणि व्यसनाची सुरुवात होते. आज व्यसनाचा चेहरा बदलला आहे. दारू, तंबाखू आणि अमली पदार्थ सोबतच मोबाईल, सोशल मीडिया, ऑनलाईन गेम्स आणि इंटरनेटचे अतिरेकी आकर्षण तरुणांच्या मानसिक आरोग्याला पोखरत आहे. तथापि, व्यसन हे अनेकदा मूळ समस्या नसते; ते मनातील वेदनेचे, एकाकीपणाचे आणि असहायतेचे लक्षण असते. जेव्हा मनाला आधार मिळत नाही, तेव्हा व्यसनाचा हात सहज पुढे येतो. परंतु हा आधार खोटा असतो, हे जाणून घ्या. व्यसन अख्ख्या कुटुंबाची मानसिक शांतता हिरावून घेते. या समस्येवर उपाय फक्त व्यसनमुक्ती केंद्र नाही तर त्याची सुरुवात घरातून व्हायला हवी. मुलांना केवळ पैसा, मोबाईल किंवा सुविधा नकोत; त्यांना वेळ, विश्वास आणि संवाद हवा असतो. अनेकदा पालकांनी न बोलता ऐकले, तरी अर्धी समस्या सुटते. शाळा-महाविद्यालयांनीही गुणांच्या शर्यतीबरोबर विद्यार्थ्यांच्या मनाची काळजी घ्यायला हवी. समुपदेशन, योग, खेळ, कला, वाचन आणि जीवनकौशल्य यांना शिक्षणाइतकेच महत्त्व दिले पाहिजे. गरज आहे ती व्यसनाविषयी भीती निर्माण करण्याची नाही, तर मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याची. प्रत्येक घरात मनाविषयी मोकळेपणाने बोलले गेले, प्रत्येक पालकाने मुलांसाठी थोडा वेळ दिला, प्रत्येक शिक्षकाने विद्यार्थ्याला समजून घेतले आणि प्रत्येक तरुणाने मदत मागण्यास संकोच केला नाही, तर अनेक आयुष्ये व्यसनाच्या अंधारातून बाहेर येऊ शकतील. आपण मुलांना यशस्वी होण्याचे धडे देतो; आता त्यांना आनंदी राहण्याचेही धडे देऊया. कारण यशस्वी माणूस समाज घडवतो, देशाची खरी संपत्ती उंच इमारती, आधुनिक तंत्रज्ञान किंवा आर्थिक विकास नसतो; तर मानसिकदृष्ट्या सक्षम, संवेदनशील आणि सुसंस्कृत तरुणाई असते. त्या तरुणाईचे मन जपणे ही आज प्रत्येक कुटुंब, समाज आणि शासनाची सामूहिक जबाबदारी आहे. कारण... मन निरोगी असेल, तरच भविष्य उज्ज्वल असेल.

**मंजुळा हाडके-दळवी**/औंध-पुणे

■■■

### जागरूक वारी निर्मूया...

'पंढरीचा महिमा । देतां आणिक उपमा ।।' संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातून पंढरपूर वारीचा महिमा लक्षात येतो. सध्या राज्यातून विठ्ठलाच्या भेटीस अनेक संत पालखींचे प्रस्थान होत आहे. अनेक दिंड्या विठ्ठल नामाचा गजर करत यात सहभागी होतात. यात युवकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. निर्मल वारी दिंडीमध्ये पाणी, वीज तसेच शौचालय सुविधातून स्वच्छता राखून निर्मल वारी संपन्न केली जाते. जल दिंडी ही दिंडी साधारण कार्तिकी एकादशीला राज्यभरातून निघते. ही दिंडी नदींच्या मार्गे निघते. यात पाणी बचत, जल प्रदूषण रोखणे व पर्यावरण महत्त्व लोकांमध्ये रुजवणे हेतू असतो. संविधान समता दिंडीमधून संविधान सर्वांपर्यंत पोहोचावे उद्देशाने संविधान समता दिंडी महाराष्ट्रभर समाजकल्याण विभाग बार्टीमार्फत काढली जाते. समता दिंडीतून राज्यातील पुरोगामी विचार संस्था, पत्रकार, साहित्यिक, कलावंत, शिक्षक सहभागी होत समाजाचे प्रबोधन करतात. ग्राहक जनजागृती दिंडी काही ठिकाणी काढली जाते. वृक्ष दिंडीमधून लोकांना पर्यावरण



संरक्षण, संगोपनाबाबत जागरूक केले जाते. अक्षर दिंडीतून हौशी कलाकार संतांचे अभंग हाताने लिहून फलक घेऊन सहभागी होतात. प्रबोधन दिंडीतून ग्रामसेवक, तलाठी सहभागी होतात. बीज दिंडीमध्ये शेतकऱ्यांसाठी विविध बियाणे त्यांचे संवर्धन विदित केले. विविध ग्रंथांचे समाजाला ज्ञान मिळावे या उद्देशाने ग्रंथ दिंडी काढली जाते. विद्यार्थी दिंडी शाळा-महाविद्यालयातून काढली जाते. अशा अनेक दिंड्या वारीत सहभागी होऊन राष्ट्र उद्धाराचे कार्य आपल्या हातून होईल यासाठी प्रयत्न केला जातो. युवकांचा यात सहभाग अधिक मोठ्या संख्येने वाढल्यास वारी परंपरा अधिक जागरुक होईल.

**विठ्ठल वळसे पाटील**/पुणे. ८४८४०६६०४२

■■■

### त्याग आणि भोग

सर्वसामान्य माणसाला एक चाकोरीबद्ध जीवन जगण्याची सवय झालेली असते. बाल्य, तारुण्य, वृद्ध या सगळ्या अवस्थातून तो आपल्याला जमेल तशा आणि जमेल तितक्या प्रामाणिकपणे जगण्याचा प्रयत्न करतोच. प्रापंचिक जबाबदाऱ्यांना प्राधान्य देतो. त्यानंतर देव-धर्मालाही वेळ देतो. प्रवाहाबरोबर जाणे त्याला सुरक्षित वाटते. प्रवाहाबाहेरची संकटे, संघर्ष, कष्ट, त्याचे होणारे परिणाम आणि ते सहन करण्याची ताकद त्यात नसतेच; म्हणूनच तो प्रवाहाबरोबर वाहत जातो. असे असले, तरी प्रवाह सोडून आपला स्वतःचा स्वतंत्र प्रवाह निर्माण करणारे अनेक महाभाग आहेत. अशा प्रकारच्या लोकांमध्ये साधू-संत, विचारवंत, कलाकार, गायक, चित्रकार, गणिका यांचा समावेश होतो. यातही दोन प्रकारचे लोक असतात. काही त्यागी तर काही भोगी. ते मात्र स्वानंद महत्त्वाचा मानतात. मी जे करणार आहे ते प्रामाणिकपणे करणार आहे असे त्यांचे ठाम मत असते. मला आठवण झाली ६० च्या दशकातील 'चित्रलेखा' या चित्रपटाची... मगध साम्राज्यातील एक तपस्वी, योगी कुमारगिरी आणि एक राजनर्तकी आणि गणिका असलेल्या चित्रलेखा यांच्यातील संघर्ष पराकोटीला जातो. योग्याच्या त्यागाला भोगाने जिंकू पाहणारी चित्रलेखा आपल्या वागणुकीतून आणि गाण्यातून पाप-पुण्याच्या कल्पनेला छेद देते. खरे तर प्रत्येकाने आपापला नित्य आचरणातला धर्म प्रामाणिकपणे पाळला पाहिजे; पण तसे होत नाही तर त्या आचरणावरच धर्माचा शिक्का मारला जातो आणि त्यातूनच पाप-पुण्य या कल्पनेचा जन्म होतो. त्यानंतर जीवन जगणं सहज सोपं राहात नाही. मग सुरू होतो मानसिक, शारीरिक, भावनिक संघर्ष. आपल्या नृत्यकलेतून राजाला आणि इतरांना घटकाभर समाधान देणे, सुख देणे हा राजनर्तिकेच्या आयुष्याचा आणि आचरणाचा एक भाग परंतु धर्माने त्याच्यावर भोग आणि पापाचा शिक्कामोर्तब केले. दुसरीकडे एक तपस्वी, संन्यासी आपली तपःसाधना करतो तेही तो स्वखुशीने किंवा कदाचित मन मारूनही करत असेल. परमात्मप्राप्ती हे त्यांचे ध्येय, परंतु त्याच्या साधनेवर त्याग आणि पुण्याचे शिक्कामोर्तब केले जाते. एकूण काय, समाजमन कुणालाच मनाप्रमाणे जगू देत नाही. दोन्ही गोष्टी कधी स्वखुशीने घडतात तर कधी परंपरेने तर कधी स्वतःच्या मनाविरुद्धही स्वीकाराव्या लागतात. माणूस आजही संभ्रमावस्थेत आणि संघर्षातच जगतो आहे. त्याग-भोग, पाप-पुण्य या कल्पना त्याचा पिच्छा सोडायला तयार नाहीत. म्हणूनच रामदास स्वामी म्हणतात, 'आधी प्रपंच करावा नेटका, मग घ्यावे परमार्थ विवेका'.

**लता पाध्ये**/हिमायतनगर. ९४२२५३३७०५

■■■

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# अंबाजोगाई तालुक्यात खून!
## घाटनांदूरमध्ये भररस्त्यात तीक्ष्ण हत्याराने वार करून तरुणाला संपवले



**अंबाजोगाई :** तालुक्यातील घाटनांदूर येथील अण्णाभाऊ साठे चौकात शनिवारी रात्री एका तेवीस वर्षीय तरुणाची तीक्ष्ण हत्यारे आणि दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आल्याची भयानक घटना उघडकीस आली आहे. ज्ञानेश्वर वाकडे (वय २३, रा. पट्टीवडगाव) असे या मृत तरुणाचे नाव असून या जीवघेण्या हल्ल्यात त्याचा मित्र गंभीर जखमी झाला आहे. भररस्त्यात घडलेल्या या रक्तरंजित घटनेमुळे परिसरात मोठी दहशत पसरली असून नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

सूत्रांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, ज्ञानेश्वर वाकडे हा शनिवारी रात्री आपल्या एका मित्रासोबत दुचाकीवरून घाटनांदूर येथून पट्टीवडगाव या आपल्या गावाकडे जाण्यासाठी निघाला होता. हे दोघे अण्णाभाऊ साठे चौकात आले असता काही जणांनी त्यांची दुचाकी अचानक अडवली. काही समजण्याच्या आतच हल्लेखोरांनी ज्ञानेश्वर आणि त्याच्या मित्रावर तीक्ष्ण हत्यारे, दगड आणि विटांनी अमानुष हल्ला चढवला. या भयंकर मारहाणीत रक्ताच्या थारोळ्यात पडून ज्ञानेश्वरचा मृत्यू झाला. त्याच्यासोबत असलेला मित्र या हल्ल्यात गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. हा जीवघेणा हल्ला कोणत्या कारणास्तव झाला हे अद्याप समजू शकलेले नाही. कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे काढणाऱ्या या घटनेने सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# थकीत रक्कम न दिल्याने खरेदी-विक्री संघाच्या माजी अध्यक्षांच्या घराबाहेर आत्महत्येचा प्रयत्न

## कुटुंबाचा रुग्णालयात नेण्यास विरोध

**माजलगाव ( प्रतिनिधी ) तालुक्यातील वारोळा येथील रहिवासी नवनाथ गणपत पवार यांनी आर्थिक व्यवहारातील लाखो रुपयांची थकीत रक्कम मिळत नसल्याचा आरोप करत टोकाचे पाऊल उचलले.दि १० जुलै शुक्रवार रोजी सकाळी ९:३०** वाजण्याच्या सुमारास माजलगाव तालुका खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष दिपक जगन्नाथ जाधव (छत्र बोरगावकर) यांच्या स्वामी विवेकानंद नगर येथील निवासस्थानासमोर विषारी द्रव्य प्राशन करून नवनाथ पवार यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली.या प्रकारामुळे माजलगाव शहरात एकच खळबळ उडाली.

**या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार,माजलगाव तालुक्यातील वारोळा तांडा येथील नवनाथ पवार यांनी अनेक वर्षांच्या मैत्री व विश्वासाच्या नात्यामुळे खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष दिपक जाधव यांना मोठी आर्थिक मदत केल्याचा दावा केला आहे.मात्र वारंवार मागणी करूनही संबंधित रक्कम परत मिळाली नसल्याने न्याय मिळावा या मागणीसाठी त्यांनी दि १५ जून २०२६ पासून आपल्या कुटुंबासह दिपक जाधव यांच्या घरासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले होते. यावेळी काही लोकांनी मध्यस्थी करून प्रकरण मिटवले होते परंतु तरीही दिपक जाधव हे पैसे देत नसल्याने दि १० जुलै शुक्रवार रोजी जाधव यांच्या निवासस्थानासमोर सकाळी** ९:३० वाजण्याच्या सुमारास नवनाथ पवार यांनी कुटुंबीयां समवेत येऊन विषारी औषध प्राशन केल्याचे सांगण्यात आले आहे.

**उपचारासाठी रुग्णालयात नेण्यास कुटुंबीयांचा विरोध :**

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.मात्र विष प्राशन केलेल्या नवनाथ पवार यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यास त्यांच्या कुटुंबीयांनी तीव्र विरोध केला. "आमची थकीत रक्कम मिळावी, अन्यथा आमचा माणूस मेला तरी हरकत नाही," अशी आक्रमक भूमिका कुटुंबीयांनी घेतल्याने काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.सुमारे पाऊण तास चाललेल्या गोंधळानंतर महिला पोलिसांच्या उपस्थितीत पोलिसांनी नवनाथ पवार यांना ताब्यात घेऊन बळजबरीने रुग्णवाहिकेतून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

**आर्थिक व्यवहारातून टोकाचे पाऊल :**

नवनाथ पवार यांच्यावर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीबाबत अधिकृत माहिती मिळालेली नाही. या घटनेमुळे माजलगाव शहरात मोठी खळबळ उडाली असून आर्थिक व्यवहाराच्या वादातून एवढे टोकाचे पाऊल उचलले गेल्याने विविध स्तरांतून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान,या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत

# आदित्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सिरसाळा येथे ग्रामीण विकासाचा प्रत्यक्ष अनुभव
## ग्लोबल विकास ट्रस्ट मध्ये सात दिवसीय प्रशिक्षण



**बीड :** शहरातील आदित्य कृषी महाविद्यालय बी.एस्सी. (ऑनर्स) कृषी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक उपक्रम कार्यक्रमांतर्गत सात दिवसीय निवासी एन.जी.ओ. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. परळी वैजनाथ तालुक्यातील सिरसाळा येथील 'ग्लोबल विकास ट्रस्ट' अंतर्गत कार्यरत कृषिकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्रात या विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात नेहमीच विविध सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक उपक्रम राबवले जातात. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रावरील संशोधन आणि कार्यानुभावाची माहिती मिळावी, या उद्देशाने या सात दिवसीय निवासी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रशिक्षणादरम्यान ग्लोबल विकास ट्रस्टचे अधिकारी डॉ. प्रवीण मांजरे यांनी विद्यार्थ्यांना स्वयंसेवी संस्थांची कार्यपद्धती, ग्रामीण विकासातील त्यांचे योगदान, शेतकरी प्रशिक्षण उपक्रम, महिला सक्षमीकरण आणि विविध शासकीय कृषी विकास योजनांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. केवळ सैद्धांतिक माहिती न देता विद्यार्थ्यांना संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करण्याची संधी मिळाली.

### अंबाजोगाई शहर पोलिसांचा धडाकेबाज ॲक्शन मोड सुरू!
# एका दिवसात गुटखा माफिया आणि मटका चालकावर कारवाई

**अंबाजोगाई :** पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचा पदभार स्वीकारल्यापासून अवैध धंद्यांविरोधात सुरू केलेली धडक मोहीम अधिक तीव्र होताना दिसत आहे. शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अंबाजोगाई शहर पोलिसांनी पुन्हा एकदा दमदार कारवाई करत प्रतिबंधित गुटखा तस्करी आणि कल्याण मटका जुगार या दोन स्वतंत्र प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करून संबंधित आरोपींवर कारवाई केली आहे.

**पहिली कारवाई :** प्रतिबंधित गुटखा वाहतूक उघड

दिनांक 10 जुलै 2026 रोजी मध्यरात्री सदरबाजार नाका, अंबाजोगाई येथे पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. यावेळी नसरोद्दीन अल्लाउद्दीन शेख (वय 52) याच्या ताब्यातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित पान मसाला व गुटखा जप्त करण्यात आला.

या कारवाईत सुमारे ₹34,412 किमतीचा गुटखा तसेच ₹70,000 किमतीची मोटारसायकल असा एकूण ₹1,04,412 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 123, 223, 274 व 275 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**दुसरी कारवाई :** छत्रपती, शिवाजी महाराज चौकात मटका अड्ड्यावर धाड

याच दिवशी दुपारी छत्रपती शिवाजी महाराज चौक, अंबाजोगाई येथे पोलिसांनी आणखी एक धाड टाकत रोहित जयभीम काकडे (वय 30) याला कल्याण मटका जुगार चालविताना रंगेहाथ पकडले.

आरोपीकडून ₹5,100 रोख रक्कम तसेच मटका जुगाराची नोंद असलेल्या चिठ्ठ्या जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, 1887 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवैध धंद्यांना पोलिसांचा इशारा

पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या नेतृत्वाखाली अंबाजोगाई शहर पोलिसांनी अवैध व्यवसायांविरोधातील कारवाईचा वेग वाढविला असून, शहरातील गुटखा, मटका, जुगार व इतर बेकायदेशीर धंदे करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे या कारवायांवरून स्पष्ट होत आहे.

अंबाजोगाई शहरात कायदा मोडणाऱ्यांवर पोलिसांचा करडा वचक निर्माण होत असून, नागरिकांनीही अशा अवैध धंद्यांची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# गजानन महाराजांच्या पालखी सोबत चोरटे कसे ?
## गर्दीचा फायदा घेत 48 ग्रॅम सोन्याची चैन लंपास

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरात गजानन महाराज पालखी सोहळ्यात दर्शनासाठी आलेल्या एका ज्येष्ठ व्यावसायिकाच्या गळ्यातील तब्बल 48 ग्रॅम वजनाची सोन्याची चैन अज्ञात चोरट्यांनी गर्दीचा फायदा घेत लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 303(2) अन्वये गुन्हा क्रमांक 290/2026 दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुभाष भगवानराव डोंगरे (वय 81, रा. मंगळवार पेठ, अंबाजोगाई) हे 10 जुलै 2026 रोजी दुपारी सुमारे 2 ते 3 वाजण्याच्या दरम्यान साठे चौक परिसरात गजानन महाराज पालखीचे दर्शन घेण्यासाठी गेले होते. यावेळी मोठ्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील 48 ग्रॅम वजनाची सोन्याची चैन चोरून नेल्याची तक्रार त्यांनी दिली.

# आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने श्री संत मुक्ताई पालखी सोहळ्याचे बीड शहरात स्वागत!



बीड (प्रतिनिधी):- श्रीक्षेत्र मुक्ताई नगर येथून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान ठेवलेल्या श्री संत मुक्ताई यांच्या पालखी सोहळ्याचे शनिवार दि.11 जुलै रोजी बीड शहरात आगमन झाले. यावेळी सुभाष रोड येथील आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने या पालखी सोहळ्याचे ढोल-ताशा, फटाक्याची आतिषबाजी आणि वारकर्यांना आल्पोपहार देवून बीड शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा आदर्श मार्केट व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाशराव कानगांवकर यांनी भव्यदिव्य स्वागत केले. श्री संत मुक्ताई यांच्या पालखीची महाआरती झाल्यानंतर पालखी सोहळा प्रमुख हरणे महाराज, सुधाकर महाराज, बीड शहर वाहतुक शाखेचे पो.निरीक्षक वैभव पाटील व मान्यवरांचा संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. श्री संत मुक्ताई यांची पालखी गत 318 वर्षापासून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवते. गेल्या अनेक वर्षी पासून श्री संत मुक्ताईंची पालखी ही शहरात मुक्कामी असते. आज शुक्रवार दि.16 जून रोजी पालखी सोहळ्यातील वारकर्यांचे बीड शहरात आगमन झाले असता सुभाष रोडवरील आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने भव्य दिव्य स्वागत केले. साठे चौक ते माळीवेस चौका पर्यंत मनमोहक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. दरवर्षी प्रमाणे आदर्श मार्केट व्यापारी संघटनेकडून वारकर्यांना आल्पोपहार दिला गेला. श्री संत मुक्ताई यांच्या पादुकांची महाआरती संघटनेचे अध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांच्या हस्ते करण्यात आली.

# एसटी’ सेवा बंद,रस्ता खराब : सात गावांतील ग्रामस्थ संतप्त



**अंबाजोगाई :** अंबाजोगाई आगारातील जुन्या व नादुरुस्त बसांमुळे ग्रामीण भागातील प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन आमदार नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यामुळे आगाराला नव्याने पाच ‘राजमाता जिजाऊ’ बस मंजूर झाल्या आहेत. मात्र, या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाई तालुक्यातील श्रीपतरायवाडी, कोळकानडी, माकेगाव, हिवरा, सोमनाथ बोरगाव, धानोरा खुर्द आणि आपेगाव या सात गावांतील ग्रामस्थांनी ‘एसटी’ बस सेवा बंद असल्याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला आहे.

या मार्गावरील बस सेवा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, रुग्ण, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच सर्वसामान्य ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. खासगी वाहनांचे वाढलेले भाडे आणि रस्त्याची दुरवस्था यामुळे ग्रामीण भागातील ग्रामस्थांची आर्थिक व मानसिक कोंडी होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी संबंधित ग्रामस्थ लवकरच आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत. याशिवाय, प्रशासनाने वेळेत सकारात्मक निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल तसेच आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# परळी रेल्वे विकास समितीने दक्षिण मध्य रेल्वेचे मुख्य व्यवस्थापक संजयकुमार श्रीवास्तव यांची घेतली भेट
## दक्षिण मध्य रेल्वेच्या खासदारांच्या बैठकीत रेल्वेसंबंधी मागण्यांचे दिले निवेदन

**परळी वैजनाथ( प्रतिनिधी):** दक्षिण मध्य रेल्वेची सुमारे दोन वर्षांनंतर नांदेड विभागातील खासदारांची मुख्य व्यवस्थापकांसमवेत बैठक नांदेड येथे आयोजित करण्यात आली होती.

परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाच्या विकासासाठी आणि रेल्वे प्रवाशांच्या विविध प्रलंबित मागण्या मार्गी लावण्यासाठी परळी रेल्वे विकास समिती, मराठवाडा जनता विकास परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी दक्षिण मध्य रेल्वेचे मुख्य व्यवस्थापक संजयकुमार श्रीवास्तव यांच्यासह

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकरावजी चव्हाण,खासदार डॉ.अजित गोपछडे,परभणीचे खासदार बंडू जाधन यांना भेटून निवेदन सादर केले.



दक्षिण मध्य रेल्वेच्या महसूल देणाऱ्या महत्त्वाच्या स्थानकांपैकी परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाचा समावेश असूनही दक्षिण मध्य रेल्वे दुजाभाव करूनअपेक्षित सुविधा उपलब्ध नसल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. निवेदनातील प्रमुख मागण्यांमध्ये परळी वैजनाथ जंक्शनचे मध्य रेल्वेमध्ये हस्तांतरण, स्थानकावर पिट लाईन मंजूर करणे आणि ज्योतिर्लिंग वैद्यनाथ दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी पर्यटक माहिती केंद्र उभारणे यांचा समावेश आहे.

याशिवाय मुंबई-लातूर एक्सप्रेस,मछलीपट्टणम-बिदर एक्सप्रेस आणि हैदराबाद-बिदर इंटरसिटी या रेल्वेगाड्यांचा परळी/ नांदेडपर्यंत विस्तार करण्याची मागणी करण्यातआलीआहे. चार ज्योतिर्लिंगांना जोडणारी ‘ज्योतिर्लिंग एक्सप्रेस’ सुरू करण्याबरोबरच सिकंदराबाद-जम्मू तवी, कन्याकुमारी-उधमपूर, रामेश्वरम- ओखा आणि हैदराबाद- अजमेर या नव्या रेल्वे सेवा परळी मार्गे चालविण्याचाही प्रस्ताव देण्यात आला आहे. परळी वैजनाथ मार्गे पुणे, मुंबई आणि हैदराबाद यांना जोडणारी वंदे भारत एक्सप्रेस सुरू करावी, तसेच कोल्हापूर-धनबाद आणि कोल्हापूर-नागपूर या रेल्वेगाड्या दररोज धावाव्यात,अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. शहरातील वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर जलालपूर परिसरात नवीन रेल्वे उड्डाणपूल उभारावा,अशी मागणी करण्यात आली आहे. मानवत-पाथरी-सोनपेठ-परळी आणि घाटनांदूर-अंबाजोगाई-जा मखेड-दौंड या महत्त्वाच्या रेल्वे मार्ग प्रकल्पांसाठी तसेच घाटनांदूर येथे लुटमार व चोरीच्या घटना वारंवार घडत आहेत त्यांना आळा बसण्यासाठी रेल्वे सुरक्षा दल व लोहमार्ग पोलिसांची घाटनांदूर येथे आऊटपोस्टसाठी विशेष अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची मागणीही निवेदनात केली आहे. यावेळी परळी रेल्वे विकास समितीचे ज्येष्ठ मार्गदर्शक जी.एस.सौंदळे सर,मुख्य समन्वयक कैलास तांदळे,श्रीकांत पाथरकर, मुकेश भूतडा आदी उपस्थित होते.

# बीडच्या नगर रोडवरील बावळे कॉम्प्लेक्सचा स्लॅब कोसळला एसबीआय बँकेचे एटीएम सुविधाचे की दुर्घटनेचे सेंटर ?

**बीड :** बीड शहरातील नगर रोडवरील पोलिस पेट्रोल पंपाजवळील बावळे कॉम्प्लेक्समधील SBI एटीएमचा स्लॅब दोन दिवसापूर्वी अचानक कोसळल्याने मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. सुदैवाने घटनेच्या वेळी एटीएममध्ये कोणताही ग्राहक नसल्याने जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेने शहरातील जुन्या व धोकादायक इमारतींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. याची दखल घेऊन नगरपालिका काही ॲक्शन घेणार आहे का ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. वाढती लोकसंख्या आणि ग्राहकांच्या सोयीसाठी राष्ट्रीयकृत बँकासह विविध बँकांनी जागोजाग एटीएम मशीनची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. हे एटीएम अनेक वर्षांपासून एकाच इमारतीमध्ये आहे. बावळे कॉम्प्लेक्स मधील या घटनेनंतर एटीएमच्या छताचा मोठा भाग कोसळून लोखंडी सळ्या उघड्या पडल्या. काही क्षणांचा फरक पडला असता तर मोठी दुर्घटना घडली असती, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# परळीचे सुपुत्र किरण गित्ते (IAS) यांच्या ऐतिहासिक नियोजनातून त्रिपुरात 1.21 लाख कोटींची विक्रमी गुंतवणूक!
## 'डेस्टिनेशन त्रिपुरा बिझनेस कॉन्क्लेव्ह 2026' मध्ये जागतिक कंपन्यांसह 10 देशांच्या राजदूतांची उपस्थिती; गित्ते साहेबांच्या धोरणात्मक नेतृत्वाचे देशपातळीवर कौतुक.

**परळी (प्रतिनिधी) :** परळीचे सुपुत्र आणि त्रिपुरा शासनाचे उद्योग व वाणिज्य सचिव, माननीय श्री. किरण गित्ते साहेब (IAS) यांच्या दूरदृष्टी, उत्कृष्ट नियोजन आणि प्रशासकीय कौशल्यातून त्रिपुरा राज्याने औद्योगिक क्षेत्रात एक नवा इतिहास रचला आहे. गित्ते साहेबांच्या मुख्य नियोजनातून आयोजित करण्यात आलेला दोन दिवसीय 'डेस्टिनेशन त्रिपुरा बिझनेस कॉन्क्लेव्ह २०२६' अत्यंत यशस्वीरीत्या संपन्न झाला. या परिषदेच्या माध्यमातून त्रिपुरा राज्यामध्ये तब्बल १,२१,३०३+ कोटी रुपयांच्या ऐतिहासिक गुंतवणुकीचे उद्दिष्ट असणारे ३४२ हून अधिक सामंजस्य करार (MoUs) करण्यात आले आहेत. ईशान्य भारताला जागतिक गुंतवणुकीचे केंद्र बनवण्याच्या या मोहिमेचे मुख्य सूत्रधार म्हणून किरण गित्ते साहेबांच्या नावाचा आणि नेतृत्वाचा गौरव होत आहे.

केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि जागतिक दिग्गजांची उपस्थिती

या भव्य परिषदेचे उद्घाटन त्रिपुराचे माननीय मुख्यमंत्री प्रा. (डॉ.) माणिक साहा यांच्या हस्ते झाले. तर भारत सरकारचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री श्री. पियुष गोयल आणि ईशान्य प्रदेश विकास व दळणवळण मंत्री श्री. ज्योतिरादित्य एम. सिंधिया यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

**विशेष म्हणजे, किरण गित्ते साहेबांच्या धोरणात्मक प्रयत्नांमुळे जागतिक स्तरावरील १० देशांचे राजदूत आणि उच्चायुक्त या परिषदेला प्रामुख्याने उपस्थित होते. यामध्ये:**

**बांगलादेश:** उच्चायुक्त महामहिम श्री. एम. रियाझ हमीदुल्ला व सहायक उच्चायुक्त श्री. झिकुल हसन फहद

**फिलीपिन्स:** वाणिज्यदूत सुश्री मेलिसा ॲन तेलान

**तिमोर-लेस्ते:** राजदूत महामहिम श्री. कार्लिटो न्युनेस

**लाओस:** राजदूत महामहिम श्रीमती विथया झायवोंग

**कझाकस्तान:** उपराजदूत श्री. डारखान सेतेनोव्ह

**चिली:** राजदूत महामहिम श्री. जुआन रोलँडो अँगुलो मॉन्साल्वे

**नेपाळ:** प्रभारी डॉ. सुरेंद्र थापा व आर्थिक सल्लागार श्री. रवींद्र जंग थापा

**उझबेकिस्तान:** आर्थिक सल्लागार श्री. अब्दुलअजीज अब्दुखालिलोव्ह

**दक्षिण आफ्रिका:** उप उच्चायुक्त श्री. सेड्रिक चार्ल्स क्रॉली

**जपान (JETRO):** वरिष्ठ संचालक सुश्री हारुका मारुयामा यांचा समावेश होता.

देशातील पहिल्या क्रमांकाच्या सुधारणांचे 'कॅबिनेट सचिवालयाकडून' कौतुक



परिषदेत बोलताना भारत सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. व्ही. अनंत नागेश्वरन आणि कॅबिनेट सचिवालयाचे विशेष सचिव श्री. केशव कुमार पाठक यांनी त्रिपुरा राज्याचे विशेष कौतुक केले. 'अनुपालन कपात आणि नियमनमुक्ती उपक्रमा'अंतर्गत सर्व ५१ प्राधान्यक्रमाच्या सुधारणा पूर्ण करणारे त्रिपुरा हे भारतातील पहिले राज्य ठरले आहे. गित्ते साहेबांच्या मार्गदर्शनाखाली नोकरशाहीतील अडथळे दूर करून 'एक-खिडकी मंजुरी' (Single Window Clearance) आणि डिजिटल प्रशासनामुळे राज्याने 'व्यवसाय सुलभतेत' (Ease of Doing Business) देशात अव्वल स्थान मिळवले असून इतर राज्यांसाठी त्रिपुरा आदर्श बनले असल्याचे त्यांनी सांगितले.

गुगल, सेल्सफोर्ससह नामांकित कंपन्यांची मोठी भागीदारी

या कॉन्क्लेव्हमध्ये राज्यातील आणि देशाबाहेरील १,२०० हून अधिक संस्थांमधून २,००० हून अधिक मोठे गुंतवणूकदार सहभागी झाले होते. यामध्ये आयटीसी वेलकम ग्रुप, जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (JITO), गुगल (Google), सेल्सफोर्स (Salesforce), लुलू ग्रुप इंटरनॅशनल, मॅक्लेक, अंबुजा निओटिया, पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन, एनएलसी इंडिया, जीआयझेड जर्मनी यांसारख्या बलाढ्य कंपन्यांशी आयटी, एआय, हॉस्पिटॅलिटी, वैद्यकीय शिक्षण आणि ऊर्जा क्षेत्रासाठी १० प्रमुख विशेष करारांची देवाणघेवाण झाली.

**क्षेत्रनिहाय गुंतवणुकीचे सविस्तर वर्गीकरण (१,२१,३०३+ कोटी):**

**किरण गित्ते साहेबांनी तयार केलेल्या क्षेत्र-विशिष्ट (Sector-specific) धोरणामुळे सर्वच विभागांना मोठी गुंतवणूक मिळाली आहे:**

**उद्योग आणि वाणिज्य:** रु. ३०,००० कोटी

**ऊर्जा क्षेत्र (TSECL - १८,१०० कोटी + TREDA - १२,९८० कोटी):** एकूण रु. ३१,०८० कोटी

**शहरी पायाभूत सुविधा:** रु. १५,७४२ कोटी

**माहिती तंत्रज्ञान (IT & AI):** रु. १३,२४८ कोटी

**पर्यटन व परिवहन (पर्यटन - १२,३०३ कोटी + परिवहन - ३,०५६ कोटी):** एकूण रु. १५,३५९ कोटी

**आरोग्य व वैद्यकीय शिक्षण:** रु. ४,००० कोटी

**उच्च शिक्षण व शालेय शिक्षण:** रु. ३,५६८ कोटी

**बांबू, रबर, अगरवुड लागवड व प्रक्रिया:** रु. १,७०० कोटी

**कृषी, फलोत्पादन, मत्स्य आणि पशुधन (ARDD):** रु. ४,५५३ कोटी

परळीकरांसाठी आणि महाराष्ट्रासाठी गौरवास्पद कामगिरी!

त्रिपुरा मंत्रिमंडळातील सर्व प्रमुख मंत्री अनुक्रमे श्री. रतनलाल नाथ (ऊर्जा व कृषी), श्रीमती संताना चकमा (उद्योग), श्री. सुशांत चौधरी (पर्यटन), श्री. टिंकू रॉय (कामगार), श्री. शुक्ला चरण नोतिया (सहकार) आणि श्री. अनिमेश देबबर्मा (वन) यांनी गित्ते साहेबांच्या या संपूर्ण नियोजनाचे आणि गुंतवणुकीच्या धोरणाचे स्वागत केले आहे.

एका छोट्याशा राज्यात थेट जागतिक पातळीवरील गुंतवणूकदारांना आकर्षित करून १.२१ लाख कोटींचा टप्पा पार करून देणारे मुख्य आयोजक हे परळीचे सुपुत्र श्री. किरण गित्ते राहिल्यामुळे, संपूर्ण बीड जिल्ह्यात आणि महाराष्ट्रात त्यांच्या या ऐतिहासिक प्रशासकीय कामगिरीचे प्रचंड कौतुक होत असून परळीची मान देशात उंचावली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज चौक ते रेल्वे पूलापर्यंत रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन

## भारतीय जनता पक्षाचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचा पाठपुरावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जुलै**

शहराच्या अंतर्गत दळणवळणाला आणि पायाभूत सुविधांना अधिक बळकटी देण्यासाठी शहरातील अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक ते रेल्वे पूल या प्रमुख मार्गावरील सिंमेट रस्ता कामाचा भूमिपूजन सोहळा रविवारी आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी कळमनुरीचे आमदार संतोष बांगर यांची प्रमुख उपस्थिती होती. हा रस्ता हिंगोली शहराच्या वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि मुख्य मानला जातो. अनेक दिवसांपासून या मार्गाच्या नूतनीकरणाची मागणी नागरिकांमधून होत होती. आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी शासनाकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे या कामासाठी अकरा कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. सिमेंट रस्त्यामुळे नागरिकांचा प्रवास अधिक सुखकर आणि सुरक्षित होणार आहे.

याप्रसंगी बोलताना आमदार तान्हाजीराव मुटकुळे म्हणाले, हिंगोली शहराचा सर्वांगीण विकास करणे आणि नागरिकांना उत्तम दर्जाच्या सोयी-सुविधा पुरवणे हेच आपले मुख्य ध्येय आहे. शहरातील जनतेच्या गरजा सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध असून, विकासाचा हा रथ असाच अविरतपणे पुढे सुरू राहील.

या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, कार्यकारी अभियंता सुरेश जोशी, माजी नगराध्यक्ष दिलीपराव चव्हाण, माजी नगराध्यक्ष जगजीतराज खुराणा, ज्येष्ठ नेते के.के. शिंदे, प्रशांत पाटील गोरेगांवकर, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, शासकीय कंत्राटदार मयुर कयाल, नगरसेवक हमीद प्यारेवाले, उमेश गुठ्ठे, गणेश बांगर, कैलाश शहाणे, अजय गायकवाड, अनिल नेनवाणी, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, शहर कार्याध्यक्ष पवन उपाध्ये, माजी जिप सदस्य अॅड.अमोल जाधव, बाबाराव घुगे, गोल्डी सोनी, भैय्या सवनेकर, सदाशिव सुर्यतळ, डॉ.माणीक देशमुख, नरेश अग्रवाल, समिर भिसे, पप्पु भट्ट, संजय खंडेलवाल, सचिन शिंदे, पद्माकर नायक यांच्यासह महायुतीचे व भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हिंगोली शहरातील नागरिक उपस्थित होते.

# न्यायालयाचे आदेशानुसार नवीन बांधकाम न करण्याची मागणी

## इंदिरा खुले नाट्यगृह व्यापारी संकुल प्रकरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जुलै**

शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या तसेच नगर पालिकेअंतर्गत असलेल्या इंदिरा खुले नाट्यगृहातील व्यापारी संकुल पाडून त्याठिकाणी नवीन बांधकाम करण्याची नगर पालिकेची तयारी असून याप्रकरणी संकुलातील काही व्यापाऱ्यांनी दिवाणी न्यायालयात दाद मागितली होती. न्यायालयाने दि ३० मार्च २०१९ रोजी दिलेल्या निकालानुसार तसेच इतर प्रकरणे जिल्हा न्यायालयात प्रविष्ट असल्यामुळे नवीन बांधकाम करू नये अशी मागणी व्यापाऱ्यांनी नगर पालिकेचे मुख्याधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, शहरातील इंदिरा खुले नाट्यगृहासभोवती मोठे व्यापारी संकुल आहे. सदरील व्यापारी संकुल नगर पालिकेअंतर्गत असून या व्यापारी संकुलात सन १९८२ पासून किरोयदाराच्या हक्काने ताबा ठेवून अनेक व्यापारी उपभोग घेत आहेत.

सन २०१२ मध्ये नगर पालिका कार्यालयामार्फत नवीन बांधकाम करण्याकरिता जुने बांधकाम पाडण्याची तयारी सुरू असल्याचे कळाल्यानंतर काही व्यापाऱ्यांनी हिंगोली दिवाणी न्यायालयात कायमचा मनाई हुकुम मिळण्यासाठी नगर पालिकेविरूध्द दावे दाखल केले होते. त्यापैकी दि दावा क्रमांक २२१/२०१२ हा दि ३० मार्च २०१९ चे निकालानुसार मंजूर झालेला आहे. तसेच दि दावा क्रमांक २२५/२०१२ दि १४ आक्टोबर २०१९ रोजी मंजूर झालेला आहे. तसेच न्यायालयाने अर्जदाराचा ताबा संरक्षित केलेला आहे. तसेच इतर प्रकरणामध्ये जिल्हा न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहेत. त्यामुळे दिवाणी न्यायालयाच्या आदेशाचे पालन करून तसेच काही प्रकरणे जिल्हा न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्यामुळे इंदिरा खुले नाट्यगृह येथील गाळ्याबाबत नवीन बांधकामाची किंवा इतर कोणतीही कार्यवाही करू नये अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर अब्दुल रहीम, नरसिंग अग्रवाल, संतोष शर्मा, जयप्रकाश गोरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# नांदुरा देवी येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत धोकादायक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जुलै**

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नांदुरा (देवी) येथील शाळेच्या इमारतीची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, येथे कधीही मोठी दुर्घटना घडण्याची भीती निर्माण झाली आहे. या शाळेत इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंतचे वर्ग भरवले जातात. मात्र, येथील वर्गखोल्यांचे बांधकाम तब्बल ७० ते ८० वर्षे जुने असल्याने या खोल्या पूर्णपणे जीर्ण झाल्या आहेत.

शाळेतील १ ते २ खोल्यांची अवस्था तर एवढी बिकट आहे की त्या कधीही कोसळू शकतात. अशा अत्यंत धोकादायक स्थितीत निष्पाप विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून शिक्षण घ्यावे लागत आहे. पावसाळ्यात किंवा वादळी वाऱ्यात ही भीती अधिकच वाढते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नांदुरा (देवी) येथील गावकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. शाळेसाठी त्वरित ५ नवीन वर्गखोल्या मंजूर करून उपलब्ध करून द्याव्यात, जेणेकरून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरक्षित वातावरणात होऊ शकेल, अशी आर्त विनंती गावकऱ्यांनी व पालकांनी प्रशासनाकडे केली आहे. एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी शिक्षण विभाग आणि संबंधित प्रशासन यावर काय पाऊल उचलणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



**हिंगोली– येथील जिल्हा सामान्य रूग्णालयात गरीब व गरजुंना अक्षय साईपात्र अन्नछत्र सेवाच्यावतीने अन्नदान केले जाते. येथील सुप्रसिध्द कंत्राटदार रामचंद्र कयाल व त्यांच्या सुविद्य पत्नी यांचेहस्ते गरजूना साड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी अक्षय साईपात्र अन्नछत्र सेवाचे कार्यकर्ते उपस्थित होते. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रीय बालपुरस्कारासाठी नामांकन सादर करा

हिंगोली– महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी पात्र मुला-मुलींचे ऑनलाइन नामांकन सादर करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. महिला व बाल विकास मंत्रालय, नवी दिल्ली येथील संयुक्त सचिव यांच्या दि. १८ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी नामांकन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या पुरस्कारासाठी सर्व नामांकने व शिफारशी ३१ जुलैपर्यंत केवळ ऑनलाइन पद्धतीने स्वीकारण्यात येणार आहेत. इच्छुकांनी व संबंधित शाळा, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच नागरिकांनी पात्र मुला-मुलींचा शोध घेऊन त्यांचे नामांकन राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर विहित मुदतीत ऑनलाइन सादर करावे. सदर नामांकन राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर करता येणार असून, अधिकाधिक पात्र मुलांना या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी नामांकित करण्यासाठी सर्व संबंधितांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### माय भारत उपक्रमांतर्गत नोंदणीसाठी बैठक

हिंगोली– भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'मेरा युवा भारत (माय भारत)' उपक्रमाअंतर्गत युवा नोंदणी अभियानाला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर यांनी मेरा युवा भारत संकेतस्थळ, उपक्रमाची उद्दिष्टे, युवकांसाठी उपलब्ध स्वयंसेवा संधी, अनुभवाधारित शिक्षण कार्यक्रम तसेच जिल्ह्यात सुरू असलेल्या युवा नोंदणी अभियानाची सविस्तर माहिती सादरीकरणाद्वारे दिली. यावेळी युवा नोंदणी अभियानासाठी तयार करण्यात आलेल्या जनजागृती पोस्टरचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सक्रिय सहभाग घेऊन जास्तीत जास्त युवकांची मेरा युवा भारत संकेतस्थळावर नोंदणी करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक शाखेनुसार उपलब्ध स्वयंसेवा, कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख संधींची माहिती देण्यावरही भर देण्यात आला. यावेळी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य आर. व्ही. बोथीकर, शासकीय तंत्रनिकेतनचे जे. व्ही. वानखेडे, प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. पवन वासनिक, प्रा. डॉ. किशोर इंगोले, डॉ. सचिन हाटकर, डॉ. सोपान खरात, स्काऊट आणि गाईड्सच्या जिल्हा संघटक माधुरी दळवी तसेच डॉ. विजय निलावार उपस्थित होते.

### विलास कान्हेड यांचे मरणोत्तर नेत्रदान



हिंगोली– शहरातील ज्येष्ठ नागरिक विलास गुलाबसा कान्हेड वय ८० यांचे दि ११ जुलै रोजी अकस्मात निधन झाले असून त्यांनी मरणोत्तर नेत्रदान करण्याचा संकल्प घेतला होता. त्यानुसार गॅलक्सी सेवाभावी संस्था आणि जिल्हा सामान्य रूग्णालयाच्यावतीने नेत्र दान करण्यासाठी प्रक्रिया करण्यात आली. विलास कान्हेड यांच्या पार्थिवावर दुपारी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

# स्व. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्रास सीईओंची भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जुलै**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी आज वसमत येथील मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन केंद्र व पंचायत समिती, वसमत येथे भेट देऊन पाहणी केली.

यावेळी त्यांनी संशोधन केंद्रातील सुरू असलेले हळद संशोधन प्रकल्प, शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम व पंचायत समिती अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध विकास कामांचा सविस्तर आढावा घेतला. तसेच पंतप्रधान आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल बांधकामाची स्थिती, मंजुरी व प्रलंबित कामांचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना वेळेत कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. या वेळी गटविकास अधिकारी प्रफुल तोटेवाड, जिल्हा कृषी अधिकारी अतुल वायसे आदी उपस्थित होते.

# अल्पसंख्यांक वसतीगृहातील सुविधा निर्धारीत मुदतीत पुर्ण करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जुलै**

जिल्ह्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना दर्जेदार व सुरक्षित निवासी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अल्पसंख्यांक वसतिगृहातील प्रलंबित कामे निर्धारित कालावधीत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी संबंधित विभागांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत अल्पसंख्यांक वसतिगृहातील विविध सुविधा व प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हा सहायक नियोजन अधिकारी ग. गो. चितळे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य आर. व्ही. बोथीकर, एस. एल. कोंडावार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या सर्व मूलभूत सुविधांची उपलब्धता सुनिश्चित करण्यावर भर देण्यात आला. विशेषतः सोलर वॉटर हिटर, पाईपलाईन व्यवस्था, आवश्यक फर्निचर, विद्युत जोडणी, पिण्याच्या पाण्याची सुविधा, पेव्हर ब्लॉक बसविणे, ड्रेनेज लाईन तसेच इतर आवश्यक कामे मंजूर दरपत्रकानुसार व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. मुलींच्या अल्पसंख्यांक वसतिगृहातील सर्व कामे १५ दिवसांच्या आत, तर मुलांच्या वसतिगृहातील कामे एका महिन्याच्या आत पूर्ण करून वसतिगृहे विद्यार्थ्यांच्या वापरासाठी उपलब्ध करून द्यावीत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले. कोणत्याही प्रकारचा विलंब न करता सर्व कामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांनी पार पाडावी, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी संबंधित कामांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून प्रगतीचा आढावा घेण्यात येणार असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सर्व सुविधायुक्त निवासी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कामे तातडीने पूर्ण करावीत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# संत सूरदास महाराज दिव्यांग पायीवारीचे औंढ्यात स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जुलै**

यवतमाळहून पंढरपूरकडे निघालेल्या संत सूरदास महाराज दिव्यांग पायीवारीचे शुक्रवारी (ता. ११) टाळ-मृदुंग, ढोल ताशाचा गजर, पुष्पवृष्टी आणि विठ्ठलनामाच्या अखंड गजरात जल्लोषात स्वागत केले.

डोळ्यांना जग दिसत नसले, तरी मनात विठ्ठलाचा अखंड प्रकाश घेऊन चालणाऱ्या अंध वारकऱ्यांची पावले औंढा नगरीत पडली आणि क्षणभर अवधी औंढा नागनाथ नगरी भक्तिमय झाली.

यावेळी तेजकुमार झांझरी, राजू झांजरी, उत्तमराव देशमुख, महंत शाम गीरी महाराज, भिवराजी पाटील, कडूजी पाटील, शैलेश सारडा, श्रीराम राठी, केतन झांझरी, राम निवास राठी, निळकंठ देव, पुरुषोत्तम लांबडे, निलेश सारडा, सचिन दंतवार, भारत चोंढेकर, गणेश देशमुख, आत्माराम पाटील, मारोती पाटील, हरीश सोनी, रामेश्वर भोजे, पत्रकार दत्तात्रय शेगुकर, सुनील बडजाते व देवस्थानचे वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ सुरक्षा प्रमुख बबन सोनूने यांनी वारकऱ्यांचे पुष्पहारांनी स्वागत करून फराळ, पिण्याचे पाणी, तसेच भोजनाची व्यवस्था केली.

# हिंगोलीत अग्रवाल महिला मंडळाच्यावतीने वृक्षारोपन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ जुलै**

येथील अग्रवाल महिला मंडळाच्यावतीने शहरातील अथर्व लॉन तसेच हनुमान मंदिर परिसरात ५० रोपट्यांचे वृक्षारोपन करून संगोपनाची जबाबदारी निश्चित करण्यात आली.

अग्रवाल महिला मंडळाच्यावतीने नेहमीच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, दप्तर वाटप तसेच इतर उपक्रमांचा समावेश आहे. यावेळी डॉ नीता बगडीया, श्रीमती मंजू बगडीया यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्षा मिनाक्षी बगडीया, सचिव श्रेया चौधरी, कविता अग्रवाल, रेखा अग्रवाल, ज्योती अग्रवाल, सारिका अग्रवाल, संगीता भारूका, पूजा बगडीया, अनिता केडीया यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भूकंपाने पूल ढासळला हे भंपक ?

भा वृतसेवा
ांदेड, दि. १२ जुलै -

केवळ वर्षभरातच पूल ढासळल्याच्या घटनेची ंभीर दखल घेण्यात आली असून पुलाची पाहणी करण्यासाठी आज केंद्रीय चौकशी पथक दाखल झाले. थकाने पुलाची पाहणी करून संबंधीत अधिकाऱ्यांची ांगलीच कानउघाडणी केल्याने भूकंपाने पूल ासळल्याच्या बाता या भंपक असल्याचे सिद्ध ाले आहे. विशेष म्हणजे भूकंपाने पूल ढासळला हणणाऱ्या राजकीय नेत्यांची देखील चांगलीच गोची ाली आहे.

नांदेड- लातूर महामार्गावरील पूल ढासळ्याची टना दोन दिवसांपूर्वी घडली होती. सुदैवाने या घटनेत



कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी या घटनेमुळे पुलाच्या कामाचा दर्जा सुमार असल्याचे उघड झाले. पुलाचे काम होऊन केवळ वर्ष झाले असून वर्षभरातच पूल ढासळल्याने निकृष्ट काम करून संबंधित कंपनी व अधिकाऱ्यांनी मलिदा लाटल्याची चर्चा होत आहे.

दरम्यान पुलाची पाहणी करण्यासाठी आज केंद्रीय चौकशी पथक दाखल झाले. पथकाने पाहणी केली असता पुलावरील रस्ता काही ठिकाणी दबल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यातच पुलाच्या बांधकाम ातील अनेक तांत्रिक बाबीवरून पथकाने संबंधित कंपनी व अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघाडनी केली.

दरम्यान केंद्रीय पथकातील अधिकाऱ्यांना संवाद साधण्याचा प्रयत्न केला असता पूल ढसाळन्याम गे अनेक कारणे असू शकतात. या पाहणीच्या अहवालानंतर सर्व समजेल असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# सोनखेड येथे कॅल्शियम लिक्कीडचा डचा साठा पकडला

तभा वृतसेवा
सोनखेड, दि. १२ जुलै -

परप्रांतीयांनी साठवणूक केलेला जनावरांना पाजविण्याचा कॅल्शियम लिक्विडचा साठा ११ जुलै रोजी एम आर च्या मदतीने सोनखेड येथे पकडला.

याबाबत अधिक माहिती अशी की मुजफ्फराबाद उत्तर प्रदेशातून येथून यूपी १२ डी.टी ८७०६ या क्रमांकाचे आयशर टेम्पोमध्ये भरून सोनखेड येथील गोदामामध्ये उतरत होते नांदेड कडून येणारे एम आर (चठ) गंगाधर चव्हाण व पांडुरंग क्षीरसागर यांच्या लक्षात आल्याने त्यांनी विचारपूस केली असता समाधान कारक माहिती न मिळाल्याने व सदरील एम आर हे त्याच व्यवसायात असल्याने त्यांनी तात्काळ पोलीस ठाण्याला माहिती दिली. सदरील माल हा साठवणूक करून एकंदरीत बारा दुचाकीवरून ते पाच लिटरचे कॅन प्रत्येकी तीनशे रुपय दराने खेडेगावात पशुपालकांना विकण्यासाठी आणले होते परंतु त्याची आज रोजी बाजार भाव किंमत परवानाधारक औषधी दुकानदाराकडून घेतल्यावर साडेपाचशे रुपये आहे हे लिक्विड दुधाळ जनावरांना चाऱ्याच्या पाण्याच्या माध्यमातून एका वेळी ५०



ग्राम दिल्या जाते त्यामुळे दुधातील फॅट आणि दुधाचे प्रमाण वाढण्यास मदत होते मग आठशे रुपयांचा कॅन ३०० रुपयाने इतक्या अल्प दरात कसा काय विकत आहेत हे लक्षात आल्यानंतर त्याने प्रशासनाला संपर्क साधल्यावर सोनखेड पोलीस ठाण्याचे पोउपनि पाम्पट वार व

पो हे.कॉ.ज्ञानेश्वर तिडके यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली आणि लिक्विडचे कॅन असलेला आयशर टेम्पो आणि तीन परप्रांतीय विक्रेते सोनखेड पोलिसांनी प्राथमिक तपासणीसाठी ताब्यात घेतले तर अन्य सहा जण फरार झाले व उर्वरित माल व बारा दुचाकी असलेल्या दोन्ही गोदामाला देखील कुलूप लावले आणि आता अन्न भेसळ प्रशासन,केंद्रीय पशू पालन दूध व्यवसाय मंत्रालय (भारतीय मानक ब्युरो) पशुसंवर्धन विभाग नांदेड यांच्याशी पत्रव्यवहार करून पुढील तपासणी करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल अशी माहिती सोनखेड पोलिसांनी दिली आहे. *यावेळी सोनखेड येथील पशु वैद्यकीय अधिकारी जाधव यांना बोलावले असता त्यांनी हे काम अन्न व भेसळ विभागाचे सांगुन हात झटकले* यावेळी एम आर गंगाधर चव्हाण यांनी सांगितले की सदरील औषध हे बनावट असून त्यामुळे जाणवरांना वांझ पणा येण्याची दाट शक्यता आहे व हे मेडिकल शिवाय दुसरीकडे विकता येत नाही त्याच्या वरील ट आर कोड वर कंपनी चा पत्ता सुद्धा बनावट आहे सोनखेड पोलिसांनी संबंधित विभागाला पत्र व्यवहार केल्याची माहिती दिली असून नंतर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगितलं आहे

## रोटरी क्लब नांदेडच्या अध्यक्षपदी सुरेशराव अंबुलगेकर यांची निवड

**नांदेड** -रोटरी क्लब नांदेड व रोटरी क्लब नंदीग्राम वर्ष २०२६-२७ या वर्षाच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा आणि संचालक मंडळाचा पदग्रहण सोहळा रविवार, १२ जुलै रोजी दुपारी १ वाजता मोठ्या उत्साहात पार पडला. सर्वप्रथम प्रमुख पाहूणे प्रांतपाल रो. क्षितीज झावरे, सह प्रांतपाल रो. संजय पाटील, रो. शिवशंकर पाटील यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून या कार्याक्रम ाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा आणि विविध जिल्ह्यातून आलेल्या रोटरी क्लबच्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला.त्यानंतर वर्ष २०२६-२७ या वर्षाच्या रोटरी क्लब नांदेडच्या नूतन अध्यक्षपदी रो. सुरेश अंबुलगेकर यांची तर सचिवपदी रो. प्रशांत गुर्जर यांची निवड करण्यात आली. तर रोटरी क्लब नंदीग्रामच्या नूतन अध्यक्षपदी रो. डॉ. सुरभी राठोर यांची तर सचिवपदी रो. सुनंदा देवणे यांची निवड करण्यात आली. रोटरी क्लब ऑफ नांदेडचे मावळते अध्यक्ष रो. सीए मितेश मालीवाल यांनी नूतन अध्यक्ष रो. सुरेश अंबुलगेकर आणि सचिव रो. प्रशांत गुर्जर यांच्याकडे पदभार सोपवला. तर रोटरी क्लब नंदीग्रामच्या मावळत्या अध्यक्षा स्मिता गंदेवार आणि सचिव रो. डॉ. रामचंद्र हेंडगे यांनी नूतन अध्यक्ष आणि सचिवाकडे रोटरी क्लब नंदीग्राम चा पदभार सोपवला. रोटरी क्लब दरवर्षी वेगवेगळे उपक्रम राबवते त्याच बरोबर सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याची नेहमी काळजी घेते विविध प्रकारचे आरोग्य शिबीर राबवून मोफत नागरिकांची आरोग्य तपासणी करत असते. यावेळी रोटरी क्लब नांदेडच्या सदस्यांची रो. डॉ.संदिप पतंगे यांनी तपासणी केली. महात्मा फुले हायस्कुल नाईक नगर आणि नारायणराव भालेराव हायस्कुल स्नेहनगर या शाळेना डिजिटल क्लास रूमसाठी एलसीडी टिव्ही देण्यात आली. तसेच गोरगरीब विद्यार्थ्यांना यावेळी शालेय साहित्यांचे देखील वाटप करण्यात आले. तसेच यावर्षी रोटरी क्लब नांदेड चे काही नव्यांने सदस्य झालेल्या सदस्यांचे पीन देवून स्वागत करण्यात आले.त्यानंतर नुतन अध्यक्ष सुरेशराव अंबुलगेकर यांनी रोटरी क्लब नांदेडच्या माध्यमातून वर्षाभरात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली तसेच तीन नविन रोटरी क्लब करण्याचे सांगितले. रोटरी क्लबच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी औजारे बँक तयार करून शेतकऱ्यांना औजारे उपलब्ध करून देण्यात यावी अशी विनंती देखील केली. तसेच हॅप्पी स्कुल प्रोजक्ट, सरकारी शाळेत स्वच्छता गृह, शाळेत स्वच्छता मोहीम राबविणे, विद्यार्थ्यांना कंम्पोस खत निर्मिती करण्याची माहिती दिली जाणार, युव्हमन मिलिकच प्राजेक्ट, रोटरी आशा कॅन्सर व्हॅन सुरू करणार, डोळ्यांची तपासणी करून चश्मे वाटप करणे, अपंग व्यक्तींना कृत्रीम हात पाय वाटप करण्याचे काम हाती घेतले यासह वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या इतर विविध उपक्रमाची माहिती नवनिवार्चित अध्यक्ष रो. सुरेश अंबुलगेकर यांनी दिली. या पदग्रहण सोहळ्याला लातूर, अहमदपूर व नांदेड जिल्ह्यातील विविध रोटरी क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोमवारी शिकाऊ उमेदवारांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १२ जुलै -

मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रद्वारा श्री गुरुगोबिंदसिंघजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदेड यांच्यावतीने १३ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वा. आयटीआय पास उमेदवारांसाठी शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत पीएमएनएएम भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.


या मेळाव्यासाठी सर्व इंजिनियरीग ट्रेडच्या प्रशिक्षणार्थ्यांची शिकाऊ उम ेदवार म्हणून भरती करण्यात येणार आहे. तरी आयटीआय पास उमेदवारांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदेड येथे उपरोक्त दिनांकास सकाळी ११ वा. उपस्थित रहावे, असे आवाहन श्री गुरुगोबिंदसिंघजी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एस. व्ही. सुर्यवंशी व सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार पी.के. अन्नपुर्णे यांनी केले आहे.

# उड्डाण पूलाच्या निकृष्ट कामाची उच्चस्तरीय चौकशी करावी: मनोहर शिंदे

तभा वृतसेवा
नवीन नांदेड, दि. १२ जुलै -

नांदेड लातूर महामार्गा क्रमांक ३६१ वरील दूध डेअरी चौरस्ता ते वाजेगाव लातूर फाटा चौरस्ता येथील पुलाचे काम पूर्ण होण्याआधीच येथील पुलाला तडे जाऊन भेगा पडल्या आहेत अर्थात या पुलाच्या दर्जाहीन कामाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित गुत्तेदारावर केटीआयएल मालक यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अन्यथा पुलाचे काम रोखण्यात येईल असा इशारा माजी जि. प. सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी दिला आहे.

नांदेड शहरालगत असलेल्या दूध डेअरी चौरस्ता



व वाजेगाव लातूर फाटा चौक या ठिकाणी महाम ार्गावरील उड्डाणपुलाचे काम पूर्ण होऊन या पुलावरून रहदारी अद्याप चालू झाली नाही तरीही

फुलांच्या भिंतीला मोठे तडे पडले आहेत. या कामासाठी वापरल्या जाणारे सिमेंटचे गट्टू यांची क्युरिंग झाली नसल्यामुळे हे गट्टू दर्जेदार नसून ते कच्चामाल असल्यामुळे त्यांना तडे जात आहेत. त्यासाठी सदरील गुत्तेदार केटीआयएलचे मालक यांनी जनतेच्या जीवित्ताचा विचार न करता स्वतःच्या फायद्यासाठी थातूरमातूर कामे करून जनतेचा जीव धोक्यात टाकला आहे. तडे गेलेल्या काही ठिकाणी थातूरमातूर वरून सिमेंट पाणी लावण्याचे काम चालू आहे. यावरून उद्या वाहतूक सुरू झाल्यावर फुल कोसळल्यास याचा जिम्मेदार कोण ? एसजीजीएस कॉलेज समोरील उड्डाणपूल दिनांक ९ जुलै रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास कोसळला आहे. सुदैवाने यात जीवित हानी झाली नाही. तसेच वाडी पाटी येतील पुलास अशाच प्रकारचे तडे जाऊन गट्टू बाहेर येत असल्याचे दिसून येते. तेव्हा या निकृष्ट दर्जाच्या कामाची जबाबदारी कोण घेणार आणि याप्रसंगी मोठी जीवितहानी झाल्यास याचा जबाबदार कोण असेल असे मत माजी जि. प. सदस्य मनोहर पाटील शिंदे धनेगावकर यांनी एका बैठकीत सांगितले. म्हणून या दर्जाहीन कामाची उच्चस्तरीय चौकशी होऊन सदरील पुलाचे काम दर्जेदार करण्यात यावे अशी शासनास विनंती माध्यमाद्वारे केली आहे.

# आष्टी गटातील शेतकऱ्यांचे विजेच्या संदर्भात भागवत देवसरकर यांची राज्यमंत्र्यांकडे मागणी

तभा वृतसेवा
हदगाव, दि. १२ जुलै -

विजेच्या लपंडावाने होरपळणाऱ्या आणि ओव्हरलोड रोहित्रांच्या (डी. पी.) समस्येने कंबरडे मोडलेल्या आष्टी जिल्हा परिषद गटातील बळीराजाला अखेर आशेचा नवा किरण मिळाला आहे. हदगाव तालुक्याचे भाजपचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर हे तालुक्यातील जनतेसाठी, विशेषतः अन्नदात्या शेतकऱ्यांसाठी पूर्णपणे 'ॲक्शन मोड'वर आले आहेत. आष्टी गटातील विदारक वीज समस्येचे समूळ उच्चाटन करण्यासाठी देवसरकर यांनी थेट मुंबई गाठत, राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री ना. मेघनाताई बोर्डीकर यांच्या दरबारी धाव घेतली. आष्टी गटात तातडीने ७५ नवीन रोहित्रे मंजूर करून ती युद्धपातळीवर बसवावीत, या मागणीचे सविस्तर गाऱ्हाणे त्यांनी निवेदनाद्वारे मांडले.

शेतकऱ्यांना आठ तास अखंडित वीजपुरवठा देण्याचे महायुती सरकारचे उदात्त धोरण असले, तरी आष्टी गटात मात्र या धोरणाला यंत्रणेच्या ढिसाळपणाचे ग्रहण लागले होते.

दिवसातून १० ते १२ वेळा वीज खंडित होत असल्याने शेती करायची कशी, हा यक्षप्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे व्होल्टेज अत्यंत कमी मिळत असल्याने शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारी वारंवार जळत आहेत. यामुळे दरडोई हजारो रुपयांचा आर्थिक भुर्दंड सोसून शेतकरी कर्जबाजारीपणाच्या खाईत लोटला जात आहे.

ऐन रब्बी आणि खरीप हंगामात पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याने, हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात असून उत्पादनात तब्बल ५० टक्क्यांची प्रचंड घट होत आहे. या दुष्टचक्रातून आष्टी गटातील संपूर्ण बळीराजा त्रस्त झाला होता.

**ऊर्जा राज्यमंत्र्यांची सकारात्मक साद; महावितरणला 'तात्काळ' आदेश**

बळीराजाची ही व्यथा केवळ कागदावर न मांडता, भागवत देवसरकर यांनी ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्यासमोर अत्यंत आक्रमकपणे व अभ्यासूपणे मांडली. शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नाची तातडीने दखल घेत, ना. मेघनाताई बोर्डीकर यांनी तत्परतेची पराकाष्ठा करत महावितरणच्या संचालकांना जागेवरच योग्य त्या कार्यवाहीचे कडक निर्देश दिले. महावितरण स्तरावरून या ७५ नवीन रोहित्रांच्या मंजुरीची आणि उभारणीची प्रक्रिया अत्यंत वेगाने सुरू होणार असल्याचे खात्रीलायक वृत्त असून, यामुळे आष्टी गटाला विजेच्या भीषण समस्येतून 'कायमस्वरूपी' मुक्ती मिळणार हे आता सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट झाले आहे.

**प्रश्न मार्गी लावल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही : भागवत देवसरकर**

आमचे महायुती सरकार हे केवळ आश्वासनांचे गाजर दाखवणारे नसून, ते 'शेतकऱ्यांचे कैवारी' म्हणून प्रत्यक्ष कृती करणारे सरकार आहे. शासनाची धोरणे लोककल्याणकारी आहेत, परंतु जिथे प्रशासकीय त्रुटींमुळे शेतकऱ्यांना यातना सहन कराव्या लागत आहेत, तिथे मी शांत बसू शकत नाही. आष्टी गटातील विजेचा हा अंधार दूर करण्यासाठी मी शासन दरबारी शेवटच्या क्षणापर्यंत लढलो. शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्यासाठी आणि त्यांच्या हक्काचा वीजपुरवठा मिळवून देण्यासाठी मी जीवाचे रान करेन; पण हा प्रश्न पूर्णतः मार्गी लावल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही! असे तालुकाध्यक्ष देवसरकर यांनी बोलताना सांगितले.

# सरपंच संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी बाळासाहेब सातोरे

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १२ जुलै -

सरपंच उपसरपंच संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या राज्यस्तरीय संघटनात्मक बांधणीला गती देत संघटनेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष पदावर नांदेड जिल्ह्यातील तरुण तडफदार नेतृत्व बाळासाहेब ऊर्फ प्रसेनजितकुमार सातोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे पाटील यांनी नियुक्तीपत्र देऊन ही नियुक्ती जाहीर केली.



नांदेड जिल्ह्याच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात बाळासाहेब उर्फ बाळू यांची उल्लेखनीय कामगिरी झाली आहे शासन दरबारी सरपंच उपसरपंच आणि ग्रामपंचायतच्या विविध समस्या मांडून त्या सोडून घेत ग्रामीण विकासात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

त्यामुळे बाळासाहेब सातोरे यांच्या नेतृत्वगुणांवर व संघटनात्मक कार्यक्षमतेवर विश्वास व्यक्त करत त्यांच्याकडे राज्य उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे कार्य अधिक बळकट होईल तसेच ग्रामीण भागातील सरपंच , उपसरपंच आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या समस्या व मागण्या शासन दरबारी प्रभावीपणे मांडल्या जातील, असा विश्वास संघटनेने व्यक्त केला आहे.

या नियुक्तीमुळे नांदेड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, विविध स्तरांतून बाळासाहेब सातोरे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांनीही संघटनेने दाखविलेल्या विश्वासाला पात्र ठरत ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांचा 'स्वाभिमान लेखणी' पुरस्काराने गौरव




**नांदेड** - जनहिताच्या प्रश्नांवर निर्भीड, वस्तुनिष्ठ आणि सातत्यपूर्ण वृत्तांकन करणारे 'टाईम्स न्यूज २४' या वृत्तपोर्टलचे संपादक तथा पत्रकार किशोरकुमार शिवाजीराव वागदरीकर यांना पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'स्वाभिमान लेखणी' पुरस्काराने रविवारी (१२ जुलै) मुंबई येथे सन्मानित करण्यात आले. आर्यारवी एंटरटेनमेंट यांच्या वतीने आयोजित 'पहिला पत्रकार, मुक्त पत्रकार, संपादक, कला, साहित्य, समाजसेवक पुरस्कार सोहळा-२०२६' या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सुरेंद्र गावस्कर हॉल येथे झालेल्या या सोहळ्यात आयोजक, लेखक, अभिनेते, दिग्दर्शक व पत्रकार महेश्वर भिकाजी तेटांबे यांच्या हस्ते वागदरीकर यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी श्रीधर कीर, विसुभाऊ बापट, अरुण म्हात्रे, पंढरीनाथ तामोरे, गुरुनाथ तिरपनकर, सुनील शिर्के, वैभव कदम, कृष्णा काजरोळकर, ड. गौरव पाटील आणि अतुल तोडकरी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. पत्रकारितेत निर्भीड, निष्पक्ष आणि जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने प्रभावी वृत्तांकन केल्याबद्दल वागदरीकर यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. डिजिटल माध्यमाच्या प्रभावी वापरातून सामाजिक, प्रशासकीय आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडत त्यांनी विश्वासार्ह पत्रकार म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.'टाईम्स न्यूज २४' या वृत्तपोर्टल आणि युट्यूब चॅनेलच्या माध्यमातून ते विविध लोकहिताच्या प्रश्नांवर सातत्याने वृत्तांकन करत असून, त्यांच्या बातम्यांची दखल प्रशासनासह समाजातील विविध स्तरांवर घेतली जाते. यापूर्वीही त्यांच्या पत्रकारितेतील योगदानाची दखल घेत विविध प्रतिष्ठित संस्थांकडून त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. 'स्वाभिमान लेखणी' पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याला आणखी एक मानाचा सन्मान लाभला असून, नांदेडच्या पत्रकारितेच्या शिरपेचातही मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या या यशाबद्दल पत्रकार, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# संगणक ऑपरेटरने हडप केली निराधर महिलेची जागा

तभा वृतसेवा
अर्धापूर, दि. १२ जुलै -

तालुक्यातील चोरंबा ग्रामपंचायतीचा अजब कारभार चव्हाट्यावर आला असून येथील संगणक ऑपरेटरने एका निराधार विधवा वयोवृध्द महिलेच्या नावे असलेल्या मालकीच्या जागेच्या अभिलेख्यात खाडाखोड करून परस्पर हस्तांतरण केले असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्या जागेवर शासनाच्या घरकुल योजनेतून घराचे बांधकाम सुरु केले असल्यामुळे या महिलेनी पोलीसात तक्रार देवून न्यायाची मागणी केली आहे.

पुर्वश्रमीच्या हदगांव तालुक्यातील आणि आज रोजी नव्याने अर्धापूर तालुक्यात समावेश झालेल्या चोरंबा गावातील ग्रामपंचायत 'ह्या' ना 'त्या' कारणाने चर्चेत असून मागील दोन महिन्यापुर्वी याच ग्रामपंचायतीच्या नियमबाह्य कामाच्या चौकशीसाठी एका पत्रकाराने उपोषण केले होते. त्यावेळी



या उपोषणाची तालुक्यासह जिल्हाभर चांगलीच चर्चा झाली. ही चर्चा संपते न् संपते तोच येथील वयोवृध्द निराधार दलित महिला धुरपताबाई रामा बहादुरे यांच्या म ालकीच्या मालमत्ता क्रमांक २१० मधील जागेवर भिमराव बाबाराव थोरात यांनी परस्पर अतिक्रमण करुन तेथे शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेमधून घरकूल बांधकाम सुरु केले असून यासाठी येथील ग्रामपंचायतीचे संगणक ऑपरेटर लक्ष्मण गरड यांनी वयोवृध्द गरिब महिलेच्या अज्ञानपणाचा गैरफायदा घेऊन तिच्या परस्पर नमुना नं. - ८ अ मध्ये खाडाखोड करुन मालकीची जागा कमी करुन त्याच जागेवर घरकुल बांधकाम केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणी जागेचे मुळ मालक धुरपताबाई रामा बहादूरे यांनी अर्धापूर पोलीस ठाण्यात धाव घेऊन लेखी तक्रार दिली आहे. या तक्रारीत त्यांनी आपल्या स्वतःच्या मालकीच्या जागेतील नमुना नं. - ८ मध्ये नोंद असलेली जागा कमी करुन माझ्या संमतीशिवाय परस्पर हस्तांतरण केल्याचा आरोप केला असून यात ग्राम पंचायतीचे संगणक ऑपरेटर लक्ष्मण गरड आणि भिमराव बाबाराव थोरात यांनी संगनमत करुन माझ्या मालकीच्या जागेवर परस्पर अतिक्रमण करुन शासनाच्या घरकूल योजनेमधील घरकुलाचे बांधकाम सुरु केले आहे. अशी तक्रार करून याची योग्य प्रकारे चौकशी करून संबंधित दोषीवर कायदेशीर करावी. अशी मागणी केली आहे.

गटविकास अधिकारी हदगांव आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांना देऊन एका वयोवृध्द, निराधार विधवा महिलेला न्याय देण्याची मागणी केली आहे. मात्र या प्रकरणात कायदा आणि नियम धाब्यावर बसवून मनमानी करित चुकीची कामे करणाऱ्या ग्रामपंचायतीच्या संबधित अधिकारी आणि कर्मचारी यांची नि:पक्षपातीपणे चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई होणार काय? किंवा वरिष्ठ अधिकारी ग्रामपंचायतीच्या अनागोंदी कारभारावर पांघरून घालणार? याकडे चोरंबासह तालुक्यातील सुजाण नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**ग्रामपंचायतीने माझ्या जागेवर परस्पर अतिक्रमण केले: धुरपताबाई बहादुरे**

मागील दहा-बारा वर्षापुर्वी माझे पती वारले असून मला मुलगा नाही. शिवाय मी वयोवृध्द असल्यामुळे मला कामधंदा होत नाही. त्यामूळे मी दोन-दोन, तीन-तीन महिने माझ्या मुलीकडे बाहेरगावी राहते. माझ्या या मजबुरीचा गैरफायदा घेवून येथील ग्रामपंचायतीने माझ्या जागेवर परस्पर अतिक्रमण केले आहे. ते अतिक्रमण काढून मला न्याय द्यावा.

**माझा कांहीही संबध नाही - ग्राम सेवक मुंगल**

चोरंबा येथील धुरपताबाई बहादुरे यांच्या जागेवरील अतिक्रमण आणि नमूना नं. - ८ मधील खाडाखोड या प्रकरणाविषयी मला कोणतीही माहिती नाही. माझ्या सेवाकाळात हा प्रकार घडलेला नाही. त्यामुळे या प्रकाराशी म ाझा कसलाही संबध नाही. अशी प्रतिक्रिया येथील ग्रामसेवक एन. आर. मुंगल यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना दिली.

## एमजीएममध्ये चौथ्या इंडोसर्ज राष्ट्रीय परिषदेचे उत्साहात उद्घाटन; 300 शल्यचिकित्सकांचा सहभाग



**छत्रपती संभाजीनगर, दि. ११ :** एमजीएम मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटलच्या एमजीएम सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी अँड अॅडव्हान्स्ड मिनिमल अॅक्सेस सर्जरी यांच्या वतीने आणि औरंगाबाद सर्जिकल सोसायटीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या चौथ्या इंडोसर्ज राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन आज द्योतन हॉल येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. चेन्नई येथील ज्येष्ठ एंडोस्कोपी तज्ज्ञ डॉ. बी. कृष्णा राव यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, अधिष्ठाता डॉ. आर. बी. बोहरा, उपअधिष्ठाता डॉ. प्रवीण सूर्यवंशी, शल्यचिकित्सा विभागप्रमुख डॉ. भास्कर मुसांडे, डॉ. राजेंद्र शिंदे, डॉ. नवीन कासलीवाल, डॉ. वैरागड, डॉ. विकास देशमुख यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, वैद्यकीय तज्ज्ञ आणि शल्यचिकित्सक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावर्षीच्या परिषदेची संकल्पना 'एव्हरीथिंग अबाउट एंडोस्कोपी फॉर सर्जन्स' अशी असून एंडोस्कोपी क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण उपचारपद्धती आणि कौशल्यांचा सर्वांगीण आढावा या परिषदेत घेतला जात आहे. उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी १८ लाईव्ह क्लिनिकल केसेस, त्यामध्ये १२ प्रमुख शस्त्रक्रिया आणि पाच तज्ज्ञांची व्याख्याने यशस्वीरित्या पार पडली. या सत्रांमधून सहभागी डॉक्टरांना अत्याधुनिक एंडोस्कोपिक प्रक्रियांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पाहण्याची आणि तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली.

एमजीएम मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटलमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून अत्याधुनिक एंडोस्कोपिक आणि मिनिमल अॅक्सेस शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या जात आहेत. या तंत्रज्ञानाचा व्यापक प्रसार व्हावा, देशभरातील शल्यचिकित्सकांना अद्ययावत प्रशिक्षण मिळावे तसेच रुग्णांना अधिक सुरक्षित, कमी वेदनादायक आणि परिणामकारक उपचार उपलब्ध व्हावेत,

## एचडीएफसी बँकेची आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये दमदार कामगिरी

**मुंबई, :** भू-राजकीय तणाव, व्यापारातील अडथळे आणि बाजारातील अस्थिरतेमुळे जागतिक अर्थव्यवस्थेसमोर आव्हाने असतानाही एचडीएफसी बँकेने आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये मजबूत आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. देशांतर्गत मागणीतील लवचिकता, विवेकी जोखीम व्यवस्थापन, तंत्रज्ञान-आधारित परिवर्तन आणि मजबूत कॉर्पोरेट गव्हर्नन्सच्या बळावर बँकेने प्रमुख व्यावसायिक निर्देशांकांमध्ये उल्लेखनीय वाढ साध्य केली.बँकेच्या कर्जवाटपात वर्ष-दर-वर्ष 12.1 टक्क्यांनी वाढ होऊन ते ₹29.37 लाख कोटींवर पोहोचले, तर एकूण ठेवींमध्ये 14.4 टक्क्यांची वाढ होऊन त्या ₹31.05 लाख कोटींवर गेल्या. ही वाढ संपूर्ण बँकिंग क्षेत्रातील ठेवींच्या वाढीपेक्षा अधिक होती. बँकेचे निव्वळ उत्पन्न ₹1.91 लाख कोटींवर पोहोचले, तर करानंतरचा नफा 10.9 टक्क्यांनी वाढून ₹74,671 कोटी झाला. बँकेचा एकूण बॅलन्स शीट 11.6 टक्क्यांनी वाढून ₹43.65 लाख कोटींवर पोहोचला, ज्यातून सातत्यपूर्ण व्यावसायिक गती आणि उत्तम मालमत्ता गुणवत्ता दिसून येते.

## भाजपा-शिवसेना महायुतीचा दणदणीत विजय

ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीपाठोपाठ आता अध्यक्षपदाच्या निवडणुकीतही भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकीय चाणक्यनीतीचा करिष्मा दिसून आला आहे. या रंजक राजकीय अंकानंतर झालेल्या ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीचे १४ तर बहुजन विकास आघाडीचे ७ उमेदवार यांनी मतदान केले. विशेष म्हणजे निवडणुकीतील पॅनलच्या माध्यमातून एकमेकांसमोर उभे ठाकलेले भाजपचे किसन कथोरे आणि कपिल पाटील या दोघांची अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मात्र एकजूट दिसून आली, हा रवींद्र चव्हाण यांच्या राजकीय प्रगल्भतेचा परिणाम असल्याचे सांगितले जात आहे. मात्र त्याचवेळी शिवसेनेचे एक मत फुटल्याने एकनाथ शिंदे यांना हादरा बसला आहे.

## वारकरी सेवा अभियानाचे उद्घाटन

**पुणे :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू तुकाराम महाराज पालखी सोहळा पंढरीच्या दिशेने रवाना होत असताना राज्यभरातून लाखो वारकरी आळंदी आणि देहूमध्ये दाखल झाले आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असलेल्या पंढरपूर वारीशी फिनोलेक्स पाईप्सने गेली तीन दशके जपलेले सामाजिक बांधिलकीचे नाते यंदा अधिक दृढ केले आहे. वारकऱ्यांच्या सेवेसाठी फिनोलेक्स पाईप्सतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फिनोलेक्स पाईप्स आणि मुकुल माधव फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

## टोयोटा किर्लोस्कर मोटर कडून विकासाला चालना

**11 जुलै 2026:** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज उत्तराखंडमध्ये शिक्षण, आरोग्य, समुदाय कल्याण आणि उपजीविका या क्षेत्रांमध्ये विविध समुदाय विकास उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्याची घोषणा केली. हे उपक्रम राज्य सरकारसोबत करण्यात आलेल्या व्यापक सामंजस्य कराराचा (एमओयू) भाग असून, आर्थिक वर्ष 2025-26 पासून उधमसिंह नगर जिल्ह्यातील खटीमा आणि नैनीताल जिल्ह्यातील हल्द्वानी येथे सर्वांगीण कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) कार्यक्रम राबविण्याचा त्यामागील उद्देश आहे. एकत्रितपणे या उपक्रमांचा 4 लाखांहून अधिक नागरिकांना सकारात्मक लाभ होण्याची अपेक्षा आहे.



## भानुदास बायनी यांचे निधन

तभा वृतसेवा.

**रविवार दिनांक 12 जुलै :** त. भा.चे जाहिरात व्यवस्थापक मनोहर यांचे वडील भानुदास मलय्या बायनी. वय 75 वर्षे रा. जुना विडी घरकुल, सोलापूर.यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्यात पत्नी, मुलगा, सुन,तीन मुली, जावई व नातवंडे आहेंत. अक्कलकोट रोडवरील पद्मशाली स्मशानभूमी येथे त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तरुण भारत चे जाहिरात विभाग प्रमुख मनोहर बायनी यांचे वडील होते.



## नेमीचंद चुडीवाल यांचे निधन

**छत्रपती संभाजीनगर :** नादंर ता.पैठण येथील जैन समाजातील ज्येष्ठ सदस्य नेमीचंद चुनीलाल चुडीवाल (वय ८९) यांचे शुक्रवार, दि.१० जुलै रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर मुळ गावी अहिल्यानगर (अहमदनगर) येथे शनिवारी ११ जुलै रोजी नालेगाव उमरधाम येथे अत्यसंस्कार करण्यात आले. दिगंबर जैन समाजातील धार्मिक कार्यक्रमामध्ये त्यांच्या सक्रीय सहभाग होता. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, नातवंडे असा परिवार आहे. वैजापूर येथील रहिवासी सौ.सुरज महावीर ठोळे यांचे वडील होते.

# मिडसांगवी येथे नाथांच्या पालखी पादुकाचे रंगले रिंगण सोहळा - बीड जिल्ह्यात दाखल

तभा वृत्तसेवा

**पैठण दि १२:-** एकनाथ महाराज पादुका पालखी सोहळ्याचा तिसरा मुक्काम कुंडल पारगाव या ठिकाणी संपन्न झाला. या ठिकाणी श्रीसंत भगवान बाबा व श्रीसंत एकनाथ महाराज संतभेट सोहळा श्रीसंत भगवान बाबा संस्थांच्या वतीने संपन्न झाल्यावर पालखी सोहळ्याने माळेगाव मार्गे प्रस्थान करून पहिल्या रिंगणासाठी मिडसांगवी येथे दाखल झाला. यावेळी मिडसांगवी येथे रिंगण सोहळ्यासाठी विसावा स्थळाचे निर्माण करण्यात आल्याने पालखी विसावा स्थळाचे लोक अर्पण सोहळा प्रमुख नाथवंशज रघुनाथबुवा गोसावी पालखीवाले, अँड. योगेश महाराज गोसावी पालखीवाले यांच्या हस्ते करण्यात आले.



वारकरी प्रथेप्रमाणे पहिले रिंगण सोहळ्याला संत भगवान बाबा गडाच्या पायथ्याशी मिडसांगवी ता. पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर या पंचक्रोशीत सुरुवात करण्यात आली. या सोहळ्यात आलेल्या हजारो वारकऱ्यांनी व महाराज मंडळी यांनी टाळ मृदुंगाच्या गजरात पहिले रिंगण मोठ्या उत्साहात साजरे केले . हा सोहळा पाहण्यासाठी व नाथांच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील हजारो भाविकांनी गर्दी केली. यामध्ये महिला भाविकांचा मोठ्या संख्येने समावेश होता.

या रिंगण सोहळ्यामुळे वारकऱ्यात पंढरीला जाण्यासाठी नवचैतन्य मिळाले आहे.

पालखी सोहळ्याच्या प्रथेप्रमाणे विठुरायाच्या पंढरीच्या आषाढी वारी सोहळ्यात सहभाग होण्यासाठी ऊन पाऊस वाऱ्याची चिंता न करिता दर गाव दर मुक्काम करीत आहे. खांद्यावर भगव्या पताका घेऊन टाळ मृदंगाचा गजर आणि भानुदास एकनाथ जय घोष करीत मुखी विठ्ठलाचा अभंग गात पंढरीच्या दिशेने पायी दिंडीत चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पावलांचा थकवा दूर करण्यासाठी नाथांच्या पादुका सोहळ्याचे पहिले रिंगण चाललेल्या प्रथेनुसार मिडसांगवी पंचक्रोशीत पालखी सोहळा प्रमुख नाथवंशज रघुनाथबुवा गोसावी पालखीवाले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. यावेळी पाथर्डी प्रशासनाच्या वतीने प्रांत अधिकारी प्रसाद मते, तहसीलदार उद्धव नाईक, पंचायत समिती गट विकास अधिकारी राजेंद्र धस, विस्तार अधिकारी गाडेकर, ह.भ.प हनुमंत शास्त्री, पोलीस निरीक्षक आनंद केकरे, मिडसांगवी सरपंच भगवान हजारे, उपसरपंच विष्णू थोरात, संदीप बेंद्रे यांच्यासह पंचक्रोशीतील विविध मान्यवर भजन मंडळी भाविकांनी नाथांच्या पादुकांचे पूजन करून आलेल्या वारकऱ्याचे स्वागत करून महाप्रसाद वाटप केला. सायंकाळी नाथाचा पालखी सोहळा मुंगसवाडे ता. पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर येथून शिरूर कासार, राक्षस भुवन बीड जिल्ह्यात दाखल झाला आहे.

## सावित्रीबाई फुले भाजी मंडईतील पात्र ओटे-गाळेधारकांना लवकरच जागांचे वाटप

### स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांची नोंदणी प्रक्रियेची पाहणी; अधिकाऱ्यांना प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** तब्बल १४ वर्षांनंतर पुन्हा सुरू होत असलेल्या संभाजीपेठ येथील सावित्रीबाई फुले भाजी मंडईतील पात्र ओटे व गाळेधारकांना लवकरात लवकर जागांचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी दिली.



महानगरपालिकेच्या वतीने मंडईतील ओटे व गाळ्यांच्या नोंदणीसाठी १ ते ४ जुलैदरम्यान आवश्यक कागदपत्रे स्वीकारण्यात आली. यामध्ये गाळे वाटप पत्र, शुल्क भरल्याच्या पावत्या, करारनामा, न्यायालयीन आदेश अथवा प्रलंबित प्रकरणांची कागदपत्रे, आधार कार्ड, पॅन कार्ड आदी कागदपत्रांचा समावेश होता.

सध्या मालमत्ता विभागाकडून प्राप्त कागदपत्रांची छाननी सुरू असून पात्र ओटे व गाळेधारकांकडून नियमानुसार शुल्क स्वीकारले जात आहे. या प्रक्रियेची पाहणी करण्यासाठी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी संबंधित कार्यालयाला भेट दिली.

यावेळी त्यांनी ओटे व गाळेधारकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच नोंदणी प्रक्रिया पारदर्शक आणि जलदगतीने पूर्ण करून पात्र लाभार्थ्यांना लवकरात लवकर जागांचे वाटप करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

संभाजीपेठ येथील सावित्रीबाई फुले भाजी मंडईचे काम पूर्णत्वाकडे असून लवकरच मंडई सुरू होणार असल्याने व्यापाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

## लोकसंख्या नियंत्रण ही आजच्या काळाची गरज- डॉ. दिपक पारधे




**सोयगाव,दि.११ जुलै :** वाढती लोकसंख्या ही देशाच्या विकासातील प्रमुख अडथळा असून,त्याबाबत जनजागृती करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ.दिपक पारधे यांनी केले. 'जागतिक लोकसंख्या दिना 'निमित्त संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित विशेष व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार होते तर प्रमुख उपस्थितीत डॉ.रावसाहेब बारोटे,कार्यालयीन अधिक्षक श्री पंकज साबळे हे होते. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लोकसंख्या नियंत्रण व शाश्वत विकास या विषयावर आपली मते मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक सुनील चौधरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. शिवाजी शिरसाट यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ . मनोजकुमार चोपडे, डॉ.पंकज गावित, डॉ. सुशील जावळे, डॉ.भगत, डॉ. प्रदीप गोल्हारे, डॉ. संतोष पडघन, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## बारावीनंतर पदवीसोबतच यूपीएससी-एमपीएससीची तयारी

तभा वृत्तसेवा



**छत्रपती संभाजीनगर :** बारावीनंतर पदवी शिक्षण घेतानाच यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग, एसएससी आणि इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करता यावी, यासाठी एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी-एडीटी) विद्यापीठाच्या एमआयटी स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसने बी.ए. (अॅडमिनिस्ट्रेशन) हा एकात्मिक अभ्यासक्रम सुरू केला आहे. या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांचा वेळ, खर्च आणि स्वतंत्र तयारीचा ताण कमी होऊन पदवीसोबतच स्पर्धा परीक्षांची भक्कम तयारी होणार असल्याची माहिती स्कूलचे संचालक डॉ. सुजित धर्मपात्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेला हा अभ्यासक्रम यूपीएससी, एमपीएससी आणि बँकिंग स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमाशी सुसंगत आहे. भारतीय राज्यघटना, सार्वजनिक प्रशासन, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, आंतरराष्ट्रीय संबंध, सुशासन, सार्वजनिक धोरण, पर्यावरण, कृत्रिम बुद्धिमत्ता, चालू घडामोडी, तार्किक क्षमता, नेतृत्व, उत्तरलेखन, मुलाखत

## एमजीएम विद्यापीठाचा द हिंदू समूहासोबत सामंजस्य करार; पत्रकारिता विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख प्रशिक्षणाची संधी

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडिया आणि द हिंदू समूह यांच्यात पत्रकारिता विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण व व्यावहारिक प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे महाराष्ट्रात द हिंदू समूहासोबत असा करार करणारे एमजीएम हे पहिले विद्यापीठ ठरले आहे.



करारावर द हिंदू समूहाचे सहायक उपाध्यक्ष एम. वैद्यनाथन, सहायक महाव्यवस्थापक पी. ए. सुदेश तसेच एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ आणि कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी कुलपती अंकुशराव कदम, प्रा. जयदेव डोळे, ज्येष्ठ संपादक प्रवीण बर्दापूरकर, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, डॉ. प्राप्ती देशमुख, डॉ. परमिंदर कौर, बैजू पाटील आदी उपस्थित होते. या कराराअंतर्गत 'द हिंदू सेंटर फॉर एक्सलन्स इन जर्नालिझम'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन, न्यूज रूम व प्रेस भेटी, द हिंदूचे एक वर्षाचे सदस्यत्व, विशेष प्रकाशनांचा लाभ आणि गुणवंत विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

यावेळी एम. वैद्यनाथन यांनी विद्यार्थ्यांना दर्जेदार पत्रकारिता शिक्षण आणि उद्योगाचा प्रत्यक्ष अनुभव देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचे सांगितले. कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांनी एमजीएम विद्यापीठ विद्यार्थी, शिक्षक आणि उद्योगक्षेत्र यांच्यातील दुवा अधिक मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे नमूद केले. या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक कौशल्यात भर पडून माध्यम क्षेत्रातील करिअरसाठी ते अधिक सक्षम होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रेखा शेळके यांनी केले, तर सूत्रसंचालन विद्यार्थिनी पल्लवी बेद्रे यांनी केले.

## विभागीय बुडो मार्शल आर्ट रेफ्री सेमिनार कांचनवाडी मार्शल आर्टस ट्रेनिंग सेंटर येथे संपन्न



**बिडकीन दि १० जुलै :** मार्शल आर्टस कुंग-फू कराटे ट्रेनिंग सेंटर कांचनवाडी येथे बुडो मार्शल आर्ट विभागीय दि ५ जुलै सेमिनार घेण्यात आला या सेमिनारचे आयोजन - बुडो मार्शल आर्ट अॅमेच्युअर असोसिएशन ऑफ छत्रपती संभाजी नगर जिल्हा व बुडो मार्शल आर्ट असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विधमानाने डिव्हिजनल बुडो मार्शल आर्ट सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते, जिल्हा क्रीडा संघटक संस्थापक अध्यक्ष पवन घुगे, सचिव प्रवीण घुगे यांनी सेमिनारच्या आयोजन केले होते, बुडो मार्शल आर्ट हा एक लोकप्रिय खेळ आहे या खेळाचे तंत्रशुद्ध व तांत्रिक पद्धतीने प्रशिक्षण ब्लॅक बेल्ट विद्यार्थी व विभागातून आलेल्या प्रशिक्षकांना पंच सेमिनारच्या आयोजन केले होते. या सेमिनारमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या प्रशिक्षकांना विभागीय पंच परीक्षक प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत, बुडो मार्शल आर्ट असोसिएशन महाराष्ट्र - संघटनेचे अध्यक्ष -: शिहान लहू पारवे, टेक्निकल डायरेक्टर शिहान संतोष कुलकर्णी, टेक्निकल डायरेक्टर बुडो फेडरेशन शिहान सचिन पटेकर, नवीन ठाकूर यांनी खेळाची नियमावली व तंत्रशुद्ध पद्धतीने प्रशिक्षण देऊन प्रॅक्टिकल करून घेतले. हिंगोली जिल्हा - नवनाथ बांगर, पैठण तालुका यशोधन घुगे, छत्रपती संभाजीनगर अनुश्री घुगे, तनुश्री राठोड, धनश्री वाघ, धनश्री शिदवाडकर, ऋतुजा रणवळकर, मंगल कवडे, श्याम बुधवंत, गौरव टोकटे,युवराज दळवे

## युथिका आयोजित छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा महोत्सव 2026 आयोजन

छत्रपती सभाजीनगर युथिका ही २०० हून अधिक सदस्यांची युवा-नेतृत्वाखाली कार्यरत असलेली स्वयंसेवी संस्था असून, गेल्या पाच वर्षांपासून एड्सग्रस्त बालकांची काळजी, महिला सक्षमीकरण प्रकल्प, मासिक पाळी स्वच्छता जनजागृती व साहित्य वितरण तसेच दर सोमवारी गोशाळांना भेट देऊन ५५० हून अधिक गायींसाठी चाऱ्याची व्यवस्था अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे समाजसेवा करत आहे. संस्थेच्या संस्थापक सय्योमिता नहार यांच्या नेतृत्वाखाली युथिकाने समाजसेवेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत समाजात




आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

स्वयंभू संस्था म्हणून युथिका आपल्या सामाजिक उपक्रमांसाठी आवश्यक निधी स्वतः उभारते. त्यासाठी संस्था मॉडेल युनायटेड नेशन्स (MUN) तसेच छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा महोत्सव २०२६ यांसारख्या निधी संकलन उपक्रमांचे आयोजन करते. यंदाच्या क्रीडा हा 18 व 19 जुलै रोजी ईनफ्युटौ टर्फ बीडबायपास महोत्सवामध्ये क्रिकेट, फुटबॉल आणि पिकलबॉल या स्पर्धांचा समावेश आहे.

यंदाच्या महोत्सवाचे टायटल स्पॉन्सर रेडफिट जिम असून त्याच्या संचालिका सौ. पौर्णिमा राजपूत यांच्या सहकार्यामुळे युवकांचा विकास, तंदुरुस्ती आणि सामाजिक बांधिलकीला मोठे बळ मिळत आहे. तसेच को-टायटल स्पॉन्सर जबिंदा बिल्टस्पेसचे संचालक श्री. गुणवंत सिंह जबिंदा यांनीही या उपक्रमाला मोलाचे सहकार्य देत सामाजिक कार्याला प्रोत्साहन दिले आहे. यंदाच्या महोत्सवाचे शिक्षण प्रायोजक स्टेपिंग स्टोन्स हायस्कूल असून, श्री. झईम रहीम यांनी या उपक्रमाच्या आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले आहे.

क्रिकेट स्पर्धेत श्री. उदय फेपाळे (MOP Dominators), श्री. प्रज्वल भगत (Lumen), सौ. पौर्णिमा राजपूत (Redfit), श्री. सलमान सुरी (SK Infra), श्री. अबुबकर पटेल (Patel Strikers), श्री. अंशुमन देसाई, श्री. आयुष इसरानी, श्री. विक्रांत राजपूत (Terra), श्री. तरंग तोतला (Sledgers United) आणि श्री. सुमित सोनी (Ather) यांच्या मालकीचे संघ सहभागी होणार आहेत.

या निधी संकलन उपक्रमाद्वारे युथिका क्रीडेच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणत सामाजिक उपक्रमांना अधिक बळकटी देण्याचा प्रयत्न करत आहे.